# मराठी काव्याचे मानदंड

## खंड पहिला

डॉ.स.रा.गाडगीळ



# संतकवी तुकाराम

वाचा बोलों वेदनीती । करू संतीं केले तें ॥
न बाणता स्थिती अंगी । कर्मत्यागी लंड तो ।
तुका म्हणे अधम त्यासी । भक्ती दूषी हरीची ॥ (२६०)
आम्हां हे कौतुके जगा द्यावीं नीत । करावे फजित चुकती ते ॥
...तीक्ष्ण उत्तरे । हाती घेऊनि बाण फिरे ।
नाही भीडमार । तुका म्हणे सान थोर ॥ (२१३६)
ज्यासी आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी।
दया करणें जें पुत्रासी । तोचि दासा आणि दासीं ।
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती (३४७)

(तुकारामांचे जीवितकार्य, ते साध्य करण्यासाठी त्यांना करावा लागणारा कठोर संघर्ष आणि त्यांचे मानवतावादी स्वप्न, त्यांची परमेश्वरविषयक तात्त्विक भूमिका यांचा उल्लेख असणारे चरण वर दिले आहेत. यावरून या महान संताचे दर्शन होते. त्यांचा भगवंत मानवाच्या अंत:करणातील आहे. पंढरीचा मूर्तरूप विठ्ठल हे त्याचे प्रतीकआहे.)

ज्ञानदेव-तुकाराम या थोर संतांनी महाराष्ट्रात धार्मिक परिवर्तन करून जे भक्तियुग सुरू केले ते एक प्रकारचे क्रांतिकारक प्रबोधन युगच होते. (नवजणिवेचा वेध) युरोपमध्ये पंधरा-सोळाव्या शतकात जे प्रबोधन युग सुरू झाले ते युरोपला वैज्ञानिक युगात नेणारे क्रांतिकारक प्रबोधनयुगच होते. सॉक्रेटिस, प्लुटो, ॲरिस्टॉटल (इ.स.पूर्व पाचवे शतक) यांसारख्या महान ज्ञानसाधकांनी निर्माण करून ठेवलेले ज्ञानभांडार हाती लागल्याने युरोपची अतिवेगाने प्रगती सुरू झाली. धार्मिक अधंश्रद्धेतून युरोप बाहेर पडले आणि तेथे विज्ञानयुगच सुरू झाले. पण भारतातील परिस्थिती अगदी वेगळी होती. काही हजार वर्षांपूर्वी मानवी मनावर सत्ता चालविणाऱ्या प्रधान धर्मकल्पनेतून भारतीय समाजात कर्मकांडाविरुद्ध संघर्ष उभारणाऱ्या उपनिषदांच्या काळातही यातुश्रद्धा मावळलेली नव्हती.

छांदोग्य उपनिषदावर यात्वात्मक श्रद्धेचा अद्यापि बराच प्रभाव होता. छांदोग्य उपनिषद हे सामवेदाचे परिशिष्ट आहे. यज्ञविधीमध्ये अन्नप्राप्तीसाठी सामगान हा यात्वात्मक विधी केला जातो. यातील ऋचा ऋग्वेदातून घेतलेल्या आहेत. या ऋचागानातून (मंत्रगानातून) अन्नप्राप्ती होते, अशी यात्वात्मक श्रद्धा होती. देवांनाही मृत्यूची भीती होतीच. ''देवाः वै मृत्योः बिभ्यतः त्रयी विद्यां प्राविशन ते छंदाभिः अच्छदयम्...'' (छा.उ. १.४.२) या ताल-लयबद्ध छंदोगानाने (मंत्रगानाने) देवांना अन्नप्राप्ती झाली. (लोकायत-प्र.२ : गाणारे कुत्रे-पृ ३८ ते ४३) जवळजवळ संपूर्ण वेदवाङ्मय हे मंत्रवाङ्मय आहे. संस्कृतीच्या अदिम अवस्थेत माणूस कामनापूर्तीसाठी ईश्वर अगर तत्सम शक्ती यांना शरण जात नाही. आपल्या मंत्रसामर्थ्यावर त्याची पूर्ण श्रध्दा असते. विधियुक्त मंत्रगानाने इष्ट फलप्राप्ती झालीच पाहिजे, अशी त्या वैदिक याज्ञिकांची खात्री असते. यात्वात्मक विधीच्या ठिकाणी स्वयंभू सामर्थ्य आहे, अशी ही श्रद्धा आहे. हायड्रोजनचे दोन कण व ऑक्सिजनचा एक कण (एच. टू. ओ) यांचे रासायनिक एकीकरण होताच पाणी झालेच पाहिजे, या रासायनिक सूत्राप्रमाणे विधियुक्त मंत्रोच्चार होताच इष्ट फलप्राप्ती झालीच पाहिजे, अशीही यात्वात्मक श्रद्धा आहे. त्यासाठी एकच अट अशी की, ज्याप्रमाणे एच. टू. ओ. हे रासायनिक सूत्र अणु-रेणूनेही कमीजास्त होता उपयोगी नाही, त्याप्रमाणे विधियुक्त मंत्रोच्चार काटेकोरपणे झाला पाहिजे. सूत्रात दोष राहता कामा नये म्हणूनच फ्रेझर या मानवशास्त्रज्ञाने यज्ञीय मंत्रोच्चाराला (सूडो सायन्स) मिथ्या-भ्रामक विज्ञान असे नाव दिले आहे. मंत्रोच्चाराच्या काटेकोरपणाला–अचूकतेला महत्त्व आहे. या अचूकतेमुळेच फलप्राप्ती होते, अशी याज्ञिकांची श्रद्धा आहे. मंत्रगानात 'वेडेवाकुडे गाईन परि तुझाचि म्हणवीन' हा तुकोबाचा अभंग बसणार नाही. जवळ जवळ संपूर्ण वेदवाङ्मयाचे स्वरूप मंत्राधिष्ठित असल्याने येथे भक्तीला स्थान नाही. वैदिक मंत्रवाङ्मय आणि संताचे भक्तिवाङ्मय यांमधील मूलभूत भिन्नता ध्यानात न घेतल्याने अनेक अभ्यासकांनी भक्तीचा उद्‌गम वेदांतून (मुख्यतः ऋग्वेदातून) झाला, असा विचार आग्रहाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पंरपरेचा आधार घेतल्याशिवाय नवा विचार मांडायला माणसाचे सनातनी (conservative) मन सहजासहजी तयार होत नाही. वैदिक आर्यांचे मंत्रवाङ्मय मूलतः यात्वात्मकच आहे. यज्ञातील सर्व मंत्रांचे सामर्थ्य स्वयंभू आहे. ईश्वर या संकल्पनेचा येथे काहीही संबंध नाही. मंत्रवाङ्मयाचे पुरस्कर्ते, मीमांसक ईश्वर ही कल्पना मानतच नाहीत. यामुळे वेदवाङ्मय ईश्वराने निर्माण केले, ही कल्पना त्यांना मान्य नसणे हे स्वाभाविकच आहे. वेदांतील देवता (इंद्र, अग्नी, वरूण इ.) अर्थवादात्मक आहेत (औपचारिक). ज्याप्रमाणे वैदिक देवता म्हणजे सर्वसमर्थ ईश्वर नव्हेत अथवा यज्ञ म्हणजे पूजा अथवा उपासना नव्हे, त्याचप्रमाणे वैदिक ऋचा म्हणजे शुद्ध प्रार्थना अथवा भक्तिपर स्तोत्रे नव्हेत. ऋग्वेदातील ऋत कल्पनेची काही अभ्यासकांनी पुरावा

नसतानाही अशीच ओढाताण केली आहे. ऋत म्हणजे परमेश्वरी संकेत अथवा इच्छा असे स्पष्टीकरण डॉ. राधाकृष्णन देतात. (डॉ. राधाकृष्णन, ७८-७९) डॉ. श्रीधरराव कुलकर्णी ऋताचा भक्तिविचाराशी तसेच गीतेतील निष्काम कर्मयोगाशी संबंध जोडतात (नाथांचा भागवत धर्म). हा विचार टिकणारा मुळीच नाही. ऋग्वेदातील ऋत व ऋतधारक वरुण यांचे नैतिक साम्राज्य लोप पावल्याचे ऋग्वेदातच सांगितले आहे. कुत्सऋषी विचारतो : ''क्व ऋतं पूर्व्यं गतं कस्तद् बिभर्ति नूतनो'' (पूर्वीचे ते ऋत कोठे गेले?...आता त्याचा धारणकर्ता कोण?-ऋ १-१०५-४) नव्या युगात समतेवर-नैतिकतेवर आधारित ऋत लोप पावले होते. कुत्स ऋषीला माहीत नसावे की आता विषमतेच्या युगात वरुणही लोभी झाला होता. ऋग्वेद काळातील समाजाची नीतिमत्ता-समता या तत्त्वांचा लोप झाला होता. असे लोप पावणारे–ज्याला मृत्यू आहे, जे क्षणभंगूर आहे असे ऋत ईश्वरी संकेत अथवा ईश्वरी इच्छा कशी असू शकेल? ईश्वरच क्षणभंगूर ठरायचा! ऋग्वेदातील ऋतकल्पना विशिष्ट कालखंडातील नैतिकतेची-समतेची सामाजिक व्यवस्था दाखविते. ही सामाजिक अवस्था बदलताच ऋत लोप पावले; तेव्हा भगवद्‌गीतेत अथवा त्यांनतरच्या कालात उदयाला आलेला भक्तिविचार लोप पावलेल्या ऋतामध्ये म्हणजेच वेदांमध्ये शोधणे निरर्थक आहे. तुकारामांचा अभ्यास करताना मी वेदातील ऋत संकल्पनेकडे वाहवत गेलो असे वाटण्याचा संभव आहे. पण तुकोबांच्या वेदविषयक विचारांनी मला इकडे खेचून आणिले. अनेक वेदाभिमानी विचारवंतांनी वेदवाङ्‌मयातूनच भक्तिविचाराचा उद्‌गम झाला असा सिद्धांत मांडला आहे. ज्या ईश्वराची भक्ती करायची त्या ईश्वराची स्पष्ट संकल्पनाही ऋग्वेदाच्या शेवटच्या दोन मंडलापर्यंत (मं१व मं१०) व्यक्त झालेली नव्हती. (ही दोन मंडले त्रग्वेदाची शेवटची असावीत हा निर्णय आता सर्वसामान्य आहे : ( क्र. १-१६४-४६ व क्र. १०-११४-५). दोन मंडलात प्रथम एकेश्वरवादाची कल्पना ऋषींना स्फुरली. याचा अर्थ असा की आदिम मानवाच्या यात्वात्मक मंत्र-तंत्रापासून नारदीय सूक्तामधील तत्त्वचिंतनापर्यंत ऋषींचे विचार विकसित होत गेले. विश्वातील घटना मंत्रसामर्थ्याने अनुकूल करून घेता येतात, या कल्पनेवरील विश्वास ज्याक्षणी ढळला त्या क्षणी एक महान क्रांतिकारक युगाचा प्रांरभ झाला. या नव्या युगातच भक्तीचा जन्म होऊ शकतो. तरीही उपनिषद भगवद्‌गीतेपर्यंत सर्व वेद ब्राह्मणग्रंथांपर्यंत यात्वात्मक कल्पनेचा प्रभाव बराच होता. तेव्हा ऋग्वेदात भक्तिविचाराचा शोध घेणे निरर्थक होते. छांदोग्याच्या आधारे याचा विचार आपण पूर्वी केला आहेच. मराठी संतांनी महाराष्ट्रीय संस्कृतीला दिलेले सर्वांत मोठे योगदान म्हणजे–चार-पाच हजार वर्षे येथील धर्मजीवन, सांस्कृतिक-सामाजिक जीवन जे यात्वात्मक कर्मकांडात रुतून पडले होते त्यात संत आंदोलनामुळे बऱ्याच प्रमाणात भक्तिप्रधान धर्माचरणात परिवर्तन झाले. प्रेम, बंधुभाव, सहानभुती, करूणा, भूतदया, नैतिकता ही सुसंस्कृत मानवाची जीवनमूल्ये प्रस्थापित

झाली. यात्वात्मक कर्मकांडात प्रेम, दया, सहानभुती या मानवी भावनांना स्थानच नसते. मराठी संतांनी बाराव्या-तेराव्या शतकात एका नव्या विचाराला जी चालना दिली त्या मागे एक अत्यंत महत्त्वाची मानवी मूल्यांवर अधिष्ठित अशी भूमिका आहे. वर्ण-जातिव्यवस्थेवर अधिष्ठित अशा भारतीय मानवतेची एक प्रकारे हत्याच केली होती.

चार हजार वर्षें झाली (पुरुषसूक्तांच्या अन्याय्य सूक्तात उदय) तरी ही व्यवस्था संत कालखंडापर्यंत जशीच्या तशी होती. बहुजनसमाजाला, स्त्री-शूद्रांना आत्मोन्नतीचे, आत्मोद्धाराचे साधनच उपलब्ध नव्हते. मंत्रवाङ्मय (वेद) संस्कृतात आणि यात्वात्मक संकल्पनेवर अधिष्ठित होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ब्राह्मण-क्षत्रियांपलीकडे कोणालाही या वाङ्मयाला स्पर्श करणे (वाचन, चिंतन, मनन) अशक्य होते. ज्ञानदेव-तुकारामांना ही वर्गीय-वर्णीय विषमता जाणवली. या अन्याय्य विषमतेचा त्यांनी धिक्कारही केला, पण शेवटी त्यांनाही या विषमतेची अपरिहार्यता मान्य करावी लागली. ''अन्न मानधन हें तों प्रारब्धा आधीन'' हा सिद्धांत मान्य करावा लागला. याचे एकच कारण ते म्हणजे या अन्याय्य व्यवस्थेला हितसंबंधियांनी दिलेले दैवी अधिष्ठान हे होय. ऋग्वेदकालीन वर्ग-वर्णरहित समतेवर ऋत या नैतिक संकल्पनेवर आधारित समाजव्यवस्था लोप पावली होती. समतेचे सामाजिक नीतीचे युग संपले होते. ''अन्नोत्पादन कर्मात आता मी तुमचा साहाय्यक होणार नाही'', असे यज्ञदेव स्वत:च सांगतो. पुढे वर्गीय-वर्णीय पातळीवर तडजोड होऊन यज्ञदेव ब्राह्मण-क्षत्रियांच्या हाती आला. येथेच वर्णव्यवस्थेचे दृढीकरण झाले. ही अन्याय्य परिस्थिती बदलणे त्या काळी कोणालाही शक्य नव्हते. वर्णव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांनी या नव्या अन्याय्य व्यवस्थेला दैवी अधिष्ठाने देऊन १९व्या, २०व्या शतकापर्यंत तरी अमर करून ठेवले. या व्यवस्थेमुळे चार्वाक, बुद्ध, सरहपाद यांसारखे थोर पुरुषही हतबुद्ध झाले. बुद्धाने समताधिष्ठित संघाचा आदर्श निर्माण केला. पण ही व्यवस्था संघापुरतीच राहिली. संपूर्ण व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याचा प्रयोग ११व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी केला. पण फलश्रुती काय? कूडल संगमी जाऊन या क्रांतिकारक महापुरुषाला जलसमाधी घ्यावी लागली. महात्मा गांधीजींनी बसवेश्वरांचा ''भारतातील पहिला समाजवादी'' या शब्दांत गौरव केला आहे हे योग्यच आहे. पण त्यांच्या बलिदानातही कर्नाटकात वीरशैव संप्रदायापलीकडे वर्ण-जातिव्यवस्थेत फार मोठे परिवर्तन झाले असे म्हणता येत नाही. उलट समाजात मध्वाचार्य यांच्या संप्रदायात ब्राह्मणी कर्मकांडाचेच प्राबल्य तेथील भक्तिसंप्रदायात वाढत होते. पंढरीची विठ्ठल मूर्ती कर्नाटकात विजयनगरला नेण्यात आली होती. पुढे भानुदासांनी ती परत पंढरीला आणली. पण एक कन्नड कवी विठ्ठलाला म्हणतो ''विठ्ठला तू इकडे का बरे चोरासारखा पळून आलास? सोवळे ओवळे न पाळणाऱ्या, जातीभेदही न पाळणाऱ्या प्रदेशातून (महाराष्ट्रातून) येथे

ब्राह्मणावर कृपा करण्यासाठीच इकडे आलास हे मला माहीत आहे'' (सारांश- शं. बा. जोशी-मराठी संस्कृती)

(येथे एकनाथांनी विठ्ठलाला एकादशीचे पारणे फेडण्यासाठी संत चोखोबांच्या घरी आणिले ही महत्त्वाची घटना आठवते.) महाराष्ट्रातील ब्राह्मण वारकऱ्यांना ब्राह्मण म्हणण्यासही कर्नाटकातील माध्व ब्राह्मण तयार नाहीत. महाराष्ट्रातील उदारमतवादी आणि कर्नाटकांतील कट्टर ब्राह्मणवादी भक्तिमार्गी यांमधील भेद बोलका आहे. कर्नाटकातील भक्तिमार्गी महात्मा बसवेश्वरांना विसरून गेले की काय असा प्रश्न पडतो. मराठी संतांनी वर्ण-जातिविरोधी बंड केले नाही हे खरे. महाराष्ट्राच्या सरहद्दीजवळच घडलेली घटना (बसवेश्वर जलसमाधी) कदाचित मराठी संताच्या डोळ्यापुढे असावी. पण वर्ण-जातिव्यवस्था त्या काळात अभेद्य होती हे निश्चित.

मुळात वर्णव्यवस्था ही अर्थव्यवस्था होती. वैदिक आर्यांनी उत्तर काळात येथील जित टोळ्यांना 'शूद्र' बनविले (मुळात येथील एका स्थानिक टोळीचे (ट्राइब) नावच 'शूद्र' हे होते.) शेती (कृषिव्यवसाय) हा सुद्धा शूद्र व्यवसाय मानला जाई. वरिष्ठ वर्णियांना हा व्यवसाय वर्ज्य होता (क्र. १०-७१-९). भारतात येणारे आदिम (प्रिमिटिव्ह) आर्यसमूह ट्राइब्ज अद्यापि पशुपालन अवस्थेत होते (Pastoral tribes). कृषिसंस्कृतीशी त्यांचा विशेष परिचय नव्हता. दहा हजार ऋचांमध्ये केवळ २५-३० ऋचांत कृषीव्यवस्थेचा उल्लेख आहे. पुढे त्यांनी चातुवर्ण्यव्यवस्था निर्माण केली आणि स्वतःकडे पौरोहित्य घेऊन या व्यवस्थेला दैवी अधिष्ठान प्राप्त करून दिले. यामुळेच हा अन्याय कोणालाही दूर करणे अशक्य झाले. संतांनी या कठोर व्यवस्थेला कळसा घालून अब्राह्मण बहुजनसमाजाला आत्मोन्नतीचा-आत्मोद्धाराचा नवा मार्ग दाखविला. हाच मराठी संतांचा भक्तिमार्ग. सर्व प्रकारची कर्मकांडे त्याज्य ठरवून प्रेम, दया, करूणा, बंधुता, सत्य, भूतदया, नीती यांसारख्या मानवी मूल्यांच्या पातळीवर समाजाला आणणे हेच संताचे सर्वश्रेष्ठ कार्य असे मी मानतो. संतांनी या मूल्यांनाच देवत्व दिले. ''जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले'' तोचि साधु-तोच देव' ही उदात्त मानवतावादी भूमिका वैदिक यज्ञभूमिकेहून सर्वस्वी भिन्न आहे. वैदिक साहित्यातील यात्वात्मकतेहून पूर्ण भिन्न असा हा संतांचा विचार आहे. यातुसंकल्पनेतून समाजाला बाहेर काढून संतांनी केलेल्या सांस्कृतिक परिवर्तनाला मी क्रांतिकारक का मानतो हे स्पष्ट व्हावे, या हेतूने वेदकालापासून संतांच्या कालखंडापर्यंत यावे लागले.

संताचे काव्य आजच्या अर्थाने शुद्ध काव्य नसेलही त्यांच्यापुढे सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचे उद्दिष्ट होते. संतांचे काव्य या सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. ज्ञानदेव-तुकाराम यांच्या काव्याचा विचार करण्यापूर्वी प्रस्तुत प्रास्ताविकात चार-पाच पानांत का होईना मराठी संतांच्या क्रांतिकारक कार्याचे ऐतिहासिक माहात्म्य

थोडक्यात सांगणे आवश्यक वाटल्याने माझी भूमिका येथे मांडली आहे. वैदिक आर्यांचे मंत्रवाङ्मय (वेद-ब्राह्मण) जवळजवळ शेवटपर्यंत यात्वात्मकच आहे, हे मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाही. मानव जातीच्या उत्क्रांतिक्रमात यात्वात्मकतेला विशेष महत्त्व होते. या यात्वात्मक श्रद्धेतून तांत्रिकांचा वामाचार निर्माण झाला. उत्तर भारतात (उत्तरप्रदेशाशिवाय, आसाम, बंगाल, पश्चिम भारत, मध्यप्रदेशातील काही भाग, बिहार) भक्तिविचारही वामाचारातच रमला. वामचाराची स्त्रीसाधना काही प्रमाणात तेलंगणातही (आंध्रप्रदेश) तसेच अनेक शक्तिपीठांत सुरू झाली.

महाराष्ट्र याला जवळ जवळ अपवादच आहे. ज्ञानदेव, तुकाराम या मराठी संतांनी हा प्रवाह रोखून धरला. हे त्यांचे कार्य भारतात अभूतपूर्व आहे. हा इतिहास ध्यानात घेतल्याशिवाय मराठी संतांच्या क्रांतिकारक योगदानाचे ऐतिहासिक माहात्म्य ध्यानात येणार नाही. यासाठीच हा गद्य प्रस्ताव करावा लागला.

**संत तुकाराम - भक्तिमंदिराचा कळस**

धर्माचें पाळण । करणें पाषांड खंडण ॥
हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ।
तीक्ष्ण उत्तरें । हाती घेऊनि बाण फिरे ॥
नाही भीडभार । तुका म्हणे साना थोर ॥
ज्यासी आपंगिता नाही । त्यासी धरे जो हृदयी ॥
दया करणे जे पुत्रासी । ते दासा आणि दासी ।
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥
शुद्र वंशीं जन्मलों । म्हणोनि दंभे मोकलिलो ।
वेदांची अक्षरे याज्ञिके घोकावी । आम्ही त्याच्या बाला धरिले कंठी।
तुका तरी सहज बोले वाणी । त्याचे घरी वेदांत वाहे पाणी ।
जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ॥
उत्तमाचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥
परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥
भूतदया गायी पशूंचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ।
शांतीरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचे फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥

तुकोबांचे सर्व काव्य ही सुवर्ण-रत्नांची खाणच! किती वेचावी गमेचिना! तुकारामांच्या जीवनकार्याचे-संपूर्ण नाही, परंतु बरेचसे विचारधन वरील अभंगांत आलेले आहे. संपूर्ण तुकाराम साहित्य, त्यांच्या अंतरीची उत्कट भावोर्मी आशयधन अर्थाने (Pithy : Condensed and forcible) शब्दरूप घेते. तुकारामांच्या काव्याचे

हे मर्म आहे. या आशयघनतेनेच (Pithiness) त्यांच्या अभंगांना सुभाषितांचे रूप आले आहे. ज्यांना वैश्विक सत्याचे चिरंतनत्व जाणवते त्यांच्या वाणीला अमररूप लाभते. ज्ञानदेव आणि तुकाराम यांच्या काव्याचे हे सामर्थ्य म्हणजे मराठी भाषेचे रत्नजडित अलंकारवैभवच आहे. चिरंतन सत्याचा भावाविष्कार जगातील श्रेष्ठ कवींना जाणवतो. या कवींना अज्ञात अशा अंत:स्फूर्तीने (प्रेरणेने) झपाटलेल्या मन:स्थितीत या वैश्विक सत्याचे ज्ञान होते. हे श्रेष्ठ कवी आपल्या प्रतिभाबलाने अपूर्व अशी काव्ये निर्माण करतात. ते नव्या नव्या जीवनदर्शनांची स्वप्ने पाहात असतात. त्यातूनच त्यांना नव्या आणि अधिक उच्च पातळीवरील वास्तवाचे ज्ञान होत असते. या पातळीवर या कवींचा प्रतिभासंचार सुरू होताच अपूर्व सृष्टीची निर्मिती होत असते. ही केवळ स्वैर कल्पनेची भरारी नसते. आत्मप्रतीतीने हे थोर कवी व्यापक सत्याचे दर्शन घडवीत असतात आणि मानवी जीवन अधिकाअधिक संपन्न करतात. ही संपन्नता-नवनिर्मितीसाठी जशी भौतिक असते तशीच ती आत्मिकही असते. हे थोर प्रतिभासंपन्न कवी मानवाचे आत्मिक विश्व अधिक संपन्न करतात. संवेदनांच्या पलीकडचे असे एक नवे अपूर्व विश्व ते निर्माण करतात. सामान्य कवीच्या प्रज्ञेला न पेलणारे असे हे कार्य असते. ज्ञानदेव-तुकारामांचे काव्य या कोटीतले आहे.

जीवनावर कोसळलेल्या प्रचंड आपत्तीशी संघर्ष करता करता तुकोबांच्या अतंरंगात विविध अनुभूती आविष्काराचा मार्ग शोधत होत्या. कठोर तपश्चर्येनंतर त्यांच्या वाणीला हे असामान्य काव्यरूप लाभले. उत्कट, तीव्र अनुभव अभंगांच्या रूपाने अभिव्यक्त होऊ लागले. या प्रगट झालेल्या अनुभवांतून त्यांची वृत्ती तत्त्वचिंतनपर झाली. विश्वविषयक तत्त्वचिंतनाशिवाय काव्याला असे भव्यरूप लाभणे शक्य नसते. तुकारामांना विठ्ठलरूपाने आत्मज्ञान झाले. विठ्ठलरूप हे वैश्विक प्रेमाचे, सह-अनुभूतीचे प्रतीक आहे. या जाणिवेतूनच प्रेम, सहानभूती, करुणा, दया, बंधुता ही मानवतावादी मूल्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पायाभूत आधारच झाली. या मूल्यांशी म्हणजेच विठ्ठलरूपाशी तुकाराम एकरूप झाले. दुसऱ्याचे सुख अथवा दु:ख हे भाव त्या व्यक्तीशी (पराविया) एकरूप होऊनच ते अनुभवतात. तुकारामांनी पराविंयांशी एकरूप होण्याची ही प्रकिया आध्यात्मिक भाषेत सांगितली आहे. पण ही प्रक्रिया लौकिक पातळीवरच अधिक महत्त्वाची आहे. अगदी हाच विचार आंग्ल कवी शेली नैतिक पातळीवरून सांगतो. कवीच्या अंत:करणात 'पराविया'साठी असलेली विशाल सहानुभूती हा कवीच्या भावनात्मक वृत्तीचाच एक भाग आहे. येथे कवीच्या व्यक्तिगत भावनेला महत्त्व नाही. त्याची व्यक्तिगत अनुभूती विश्वात्मक अनुभूती झाली पाहिजे. शेलीने मानवी सहानुभूतीचे रहस्य कल्पनाशक्तीच्या (imagination) परिभाषेत मांडले आहे. "A man to be greatly good must imagine intensely; he must put himself in the place of another (तुकाराम : पराविया) and of many other." (तुकाराम : विश्वचि

झाले माझे घर...) "The Pain and pleasurs of the species must become his own." (सहानुभूती, करुणा, प्रेम, दया, मानवतावाद) "The great instrument of moral good is the imagination."

या कल्पनाशक्तीने कवी परचित्त प्रवेश करू शकतो. शेली पुढे सांगतो, "The great secret of morals is love or a going out of our own nature and an identification of ourselves with the beautiful which exists in thought, action or person not our own."

पराविया (not our own) विशाल सहानुभूती, प्रेम, करुणा या उदात्त भावनांशीं एकरूप होऊन विश्वात संचार करणाऱ्या संतांची हीच भूमिका आहे. तुकारामांनी (१७वे शतक) जो भव्योदात्त विचार अनेक अभंगांत सांगितला तोच मानवतावादी समतावादी (समाजवादी) विचार शेली, गॉडविन इ. कवी-विचारवंत-साहित्यिक अठराव्या शतकात इंग्लडंमध्ये प्रसृत करीत होते. हीच थोर कवींची वैश्विक अनुभूती!

भारतातील-महाराष्ट्रातील परिस्थिती वेगळी होती. चातुर्वर्ण्यावर अधिष्ठीत समाजरचना प्रथम धार्मिक, सांस्कृतिक पातळीवर, समतेवर अधिष्ठित होणे आवश्यक होते. ज्ञानदेव-तुकारांमानी हेच कार्य पुढे रेटण्यासाठी प्रचंड संघर्ष सुरू केला. मराठी संतांच्या भक्तिविचारात देव आणि भक्त हे द्वैत राहतच नाही. अंतिम अवस्थेत तुकाराम विश्वाशी एकरूप होतात. या एकरूपतेने त्यांची सहानुभूती वैश्विव रूप घेते. त्यांच्या ठिकाणी भेदाभेद-द्वैत उरतच नाही. विठ्ठलाप्रमाणे त्यांची अनुभूतीच वैश्विक बनते. ते देवरूपच होतात. परक्याचे भाव (सुख-दुःख) त्यांचेच होतात. कारण तेच देवरूप झालेले असतात.

भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाही देहीं ।
तुका म्हणे सुख पराविया सुख । अमृत हे मुखे स्त्रवतसे ।।

एका सुंदर अभंगात तुकाराम देव व भक्त यांचे अद्वैत स्पष्ट करतात :

देवासी अवतार भक्तासीं संसार । दोहींचा विचार एकपणे।।
भक्तांसी सोहळे देवाचिया अंगे । देव त्यांच्यासंगे सुख भोगी ।।
देवें भक्तां रूप दिलासें आकार। भक्ती त्याचा पार वाखाणिला ।।
एका अंगी दोन्ही जालीं ही निर्माण । देवभक्तपण स्वामीसेवा ।।
तुका म्हणे येथे नाही भिन्न । भक्त तोचि देव, देव भक्त ।।

तुकाराम दीर्घ तपश्चर्येतून या अवस्थेला आले. या अवस्थेला पोचण्यासाठी तुकोबांना जणु अग्निदिव्यच करावे लागले. या काळात विविध प्रकारे त्यांच्या

जीवनात आलेले अत्यंत कठोर असे अनुभव ते आपल्या अनेक अभंगांत सांगतात. तुकारामांच्या अभूतपूर्व कार्याचे प्रास्ताविक स्वरूप पाहून नंतर त्यांची तपश्चर्या आणि त्यातून परिपक्वरूप प्राप्त झालेल्या काव्यविश्वाकडे वळू.

ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रांतील नवयुगनिर्मितीच्या क्रांतिकारक कार्याचा विचार या प्रकरणात प्रारंभीच केला आहे. (प्रास्ताविक) प्रस्तुत प्रकरणात तुकारामांच्या काव्याचा विचार करावयाचा आहे. त्यांच्या काव्याचे स्वरूप बहुमुखी (Multifarious) आहे . विविध विषयांवर-लौकिक, आध्यात्मिक, तत्त्वचिंतनपर, सामाजिक, सांस्कृतिक अनेक महत्त्वाच्या विषयांवर प्रक्षोभक विचार ते आपल्या काव्यात निर्भिडपणे मांडतात. संसार-प्रपंच वर्ण-जातिव्यवस्था, वरिष्ठ जातीचा पददलितावर, शूद्र-कुणबी या हीन समजल्या गेलेल्या जातीवर होणारा अन्याय, धार्मिक कर्मकांडे, धर्मविचारांचे अंतिम उद्दिष्ट, शाक्तसंप्रदाय, भक्तीच्या रूढ संकल्पना अशा आणखी अनेक विचारांवर तुकारामांनी मार्मिक भाष्य केले. आणखी एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाचा उल्लेख केला पाहिजे. वेदवाङ्मयापासून मध्ययुगाच्या अखेरपर्यंत (तुकाराम-रामदासापर्यंत) धार्मिक, सांस्कृतिक, वैचारिक, सामाजिक जीवनात ज्या भयावह विकृती भारतात सर्वत्र प्रस्थापित झाल्या होत्या, त्यांवर ज्ञानदेव-तुकाराम व त्याकाळातील अन्य मराठी संत यांनी अत्यंत प्रखर असा प्रहार करून नवयुगनिर्मितीचा जो यशस्वी प्रयत्न केला तो भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अपूर्व-अभूतपूर्व होता. ज्ञानदेवांनी सुरू केलेल्या या कार्याला पुढे नेऊन तुकारामांनी 'हाती घेउनी बाण' अशा स्वरूपात लढाच सुरू केला. या संघर्षातून तुकारामांच्या काव्यात वीर रसाला जणु प्राधान्य मिळाले.

**संतकवी तुकाराम**

सकळिकांच्या पाया माझी विनवणी । मस्तक चरणी ठेवितसे ॥
अहो श्रोते वक्ते सकळही जन । बरे पारखून बांधा गाठी ॥
फोडिले भांडार धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही ॥
तुका म्हणे चाली जाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥
आम्हां परी धन शब्दांचीच रत्नें । शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं ॥
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वाटूं धन जन लोका ॥
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं ॥

सतराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये एकाच कालखंडात तीन महापुरुष होऊन गेले. छत्रपती शिवाजी महाराज, संत रामदास आणि देहू येथील संत तुकाराम (जन्म १६०८). विठ्ठल हे मोरे यांचे कुलदैवत होते. साहित्यक्षेत्रात संत ज्ञानेश्वरांनंतर एवढा महान युगपुरुष तुकारामांशिवाय दुसरा कोणी झाला नाही. प्रारंभकाळात वडिलांच्या

जीवनात आलेले अत्यंत कठोर असे अनुभव ते आपल्या अनेक अभंगांत सांगतात. तुकारामांच्या अभूतपूर्व कार्याचे प्रास्ताविक स्वरूप पाहून नंतर त्यांची तपश्चर्या आणि त्यातून परिपक्वरूप प्राप्त झालेल्या काव्यविश्वाकडे वळू.

ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रांतील नवयुगनिर्मितीच्या क्रांतिकारक कार्याचा विचार या प्रकरणात प्रारंभीच केला आहे. (प्रास्ताविक) प्रस्तुत प्रकरणात तुकारामांच्या काव्याचा विचार करावयाचा आहे. त्यांच्या काव्याचे स्वरूप बहुमुखी (Multifarious) आहे . विविध विषयांवर-लौकिक, आध्यात्मिक, तत्त्वचिंतनपर, सामाजिक, सांस्कृतिक अनेक महत्त्वाच्या विषयांवर प्रक्षोभक विचार ते आपल्या काव्यात निर्भिडपणे मांडतात. संसार-प्रपंच वर्ण-जातिव्यवस्था, वरिष्ठ जातीचा पददलितावर, शूद्र-कुणबी या हीन समजल्या गेलेल्या जातीवर होणारा अन्याय, धार्मिक कर्मकांडे, धर्मविचारांचे अंतिम उद्दिष्ट, शाक्तसंप्रदाय, भक्तीच्या रूढ संकल्पना अशा आणखी अनेक विचारांवर तुकारामांनी मार्मिक भाष्य केले. आणखी एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाचा उल्लेख केला पाहिजे. वेदवाङ्मयापासून मध्ययुगाच्या अखेरपर्यंत (तुकाराम-रामदासापर्यंत) धार्मिक, सांस्कृतिक, वैचारिक, सामाजिक जीवनात ज्या भयावह विकृती भारतात सर्वत्र प्रस्थापित झाल्या होत्या, त्यांवर ज्ञानदेव-तुकाराम व त्याकाळातील अन्य मराठी संत यांनी अत्यंत प्रखर असा प्रहार करून नवयुगनिर्मितीचा जो यशस्वी प्रयत्न केला तो भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अपूर्व-अभूतपूर्व होता. ज्ञानदेवांनी सुरू केलेल्या या कार्याला पुढे नेऊन तुकारामांनी 'हाती घेउनी बाण' अशा स्वरूपात लढाच सुरू केला. या संघर्षातून तुकारामांच्या काव्यात वीर रसाला जणु प्राधान्य मिळाले.

**संतकवी तुकाराम**

सकळिकांच्या पाया माझी विनवणी । मस्तक चरणी ठेवितसे ॥
अहो श्रोते वक्ते सकळही जन । बरे पारखून बांधा गाठी ॥
फोडिले भांडार धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही ॥
तुका म्हणे चाली जाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥
आम्हां परी धन शब्दांचीच रत्नें । शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं ॥
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वाटूं धन जन लोका ॥
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं ॥

सतराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये एकाच कालखंडात तीन महापुरुष होऊन गेले. छत्रपती शिवाजी महाराज, संत रामदास आणि देहू येथील संत तुकाराम (जन्म १६०८). विठ्ठल हे मोरे यांचे कुलदैवत होते. साहित्यक्षेत्रात संत ज्ञानेश्वरांनंतर एवढा महान युगपुरुष तुकारामांशिवाय दुसरा कोणी झाला नाही. प्रारंभकाळात वडिलांच्या

सांगण्यावरून परंपरेने चालत आलेला व्यापारउदीम तुकोबांनी अत्यंत चोखपणे-प्रामाणिकपणे चालविला. ''जोडोनिया धन उत्तम वेव्हारे....'' हा प्रस्तुत अभंग लेखाच्या शीर्षकास्थानीच उद्‌धृत केला आहे. या अभंगातून तुकारामांच्या अगदी वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते. पण नियतीने लवकरच त्यांचा सुखी संसार संपविला. अवघ्या विशी-बावीशीच्या आतच त्यांचे प्रापंचिक जीवन उद्‌ध्वस्त झाले. माय-बाप सोडून गेले. पहिली पत्नी गेली. मुलगा गेला. भीषण दुष्काळाने शेती बुडाली. सावकाराकडून कर्ज काढून काही दिवस काढले. पुढे कर्जही मिळेना. जवळचे स्नेही-सोबतीही फिरकेनासे झाले. या सर्व आपत्तिजनक परिस्थितीने प्रापंचिक जीवनावरील त्यांचा विश्वास उडाला. आश्चर्य असे की या सर्व दुर्दैवी घटना तुकारामांनी काव्यरूपात मांडल्या आहेत. समाजाच्या सामान्य प्रवृतीचे त्यांनी चार-दोन ओळीतच अत्यंत प्रभावी चित्रण केले आहे :

धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं ।।
जंव मोठा चाले धंदा । तंव बहिण म्हणे दादा ।।
सदा शृगांर भूषणें । कांता लवे बहुमाने ।।

सामान्य मानवाची ही मूलभूत प्रवृत्तीच आहे. मानवी स्वभावातील हे व अशी अनेक मौलिक चिरंतन सत्ये तुकाराम आपल्या कित्येक अंभगातून सांगतात. त्यांच्या अशा कसदार विधानांना सुभाषितांचे रूप लाभते ते यामुळेच. महापुराने अनेक मोठे वृक्ष कोसळतात, पण मान तुकविणारी लव्हाळी मात्र तशीच जिवंत राहातात. तुकाराम मात्र पूर्ण कोसळले. ईश्वराला शरण जाण्याचा त्यांनी निर्धार केला. या खडतर जीवनात आलेले अनुभव त्यांनी अत्यंत प्रभावी भाषेत शब्दबद्ध केले आहेत. या काळातील त्यांची आर्त, कारुण्याने ओथंबलेली मनोवृत्ती अत्यंत हृदयद्रावक शब्दांत व्यक्त झाली आहे.

संवसारें जालों अतिदुःखें दुखी ।
मायबाप सेखीं क्रमिलिया ।।
दुष्काळे आटिलें द्रव्यें नेला मान ।
स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ।।
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें ।
वेवसाय देखें तुटी येतां ।।
काय खावें आता कोणीकडे जावें ।
गावांत रहावे कोण्या बळें ।।
कोपला पाटील गांव हे लोक ।
आता घाली भीक कोण मज ।।

आतां येणें चवी सांडली म्हणती ।
निवाडा करती दिवाणात ।।
भल्या लोकींयांस सांगितली मात ।
केला माझा घात दुर्बळाचा ।।
तुका म्हणे याचा संग नव्हे भला ।
शोधीत विठ्ठला जाऊ आतां ।।

येथे तुकारामांच्या वाणीतून भूक आणि अन्न यांविषयी अतिशय दाहक उद्गार निघाले आहेत :

विती येवढेसे पोट । केवढा बोभाट तयाचा ।
जळो याची विटंबना ।भूक जना नाचवी ।।

"जीवन कलहातील या निर्घृण सत्याचा रोकडा प्रत्यय आला."(प्रा.गं.बा.सरदार) तुकाराम एके वेळी ज्या समाजामध्ये सन्मानाने राहात होते तो समाज आता त्यांना दुरावला. "लोक फार वाखा अमंगळ जाला". घरदार सोडून ते आता विठ्ठलाकडे वळले. पण लोक काहीबाही विचारून त्यांना छळू लागले. सर्वस्व गमावल्याने आता त्यांची सदैव मानखंडना होऊ लागली. 'मरण भलें परि काय अवकळा ऐसी' अशा परिस्थितीत विठ्ठलालाच शरण जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. राघव चैतन्य केशव चैतन्य परंपरेतील बाबांनी तुकोबांना 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला. त्यांची तपश्चर्या सुरू झाली. स्वप्नामध्ये येऊन नामदेवांनी तुकारामांना शतकोटी अभंग रचण्याचा आदेश दिला :

पंधरा दिवसांमजी साक्षात्कार झाला । विठोबा भेटले निराकार ।
..... वृत्ति थिरावली परब्रह्मी ।
निर्वाण जाणोनि आसन घातलें । ध्यान आरंभिले देवाजीचें ।।
सर्प विंचू व्याघ्र अंगासी झोंबले । पीडू लागले सकळिक ।
दीपकी कर्पूर कैसा तो विराळा । तैसा देह जाला । तुका म्हणे ।।

विठ्ठलाचे निराकार दर्शन आता झाले होते. येथून तुकारामांच्या वाणीने अत्यंत कारुण्यपूर्ण पण सुंदर काव्यमय रूप धारण केले. जीवनातील सर्व लौकिक व्यवहार करणे भागच होते, पण मन विठ्ठलाकडेच लागले ही एकाग्रता कथन करण्यासाठी, नदीवर पाणी आणण्यासाठी चाललेल्या गुर्जर स्त्रीची प्रतिमा संत तुकारामांनी योजिली आहे.

दुडीवर दुडी । चाले मोकळी गुजरी ।
ध्यान लागो ऐसें हरी । तुझे चरणी तैशापरि ।।

भुकेजला दुर्बल माणूस ज्याप्रमाणे निमंत्रणाची वाट पाहात बसतो त्याप्रमाणे माझी अवस्था झाली आहे. देवाला (विठ्ठलाला) ते विनंती करतात की, तुझी प्रेमखूण एकदा

जाणवली की पाण्यात असून पद्मदल जसे ओले होत नाही तसा मी जीवनात शांतपणे वावरेन.

ऐकोनि नाइकें निंदास्तुती कानीं ।
जैसा की उन्मनी योगिराज ।।
देखोनि न देखे प्रपंच हा दृष्टी
स्वप्नाचिया सृष्टी चेविल्या जेवी ।।
तुका म्हणे ऐसे जालिया वाचून ।
करणें तें तें सीण वाटतसे ।।

तुकारामांनी गुरुदर्शनानंतर आपला सर्व जीवनक्रम पूर्ण बदलला. गुरूंनी मस्तकावर वरदहस्त ठेवला. आपण संसारा-प्रपंचात वावरत असलो तरी त्यातच गुंतून पडणार नाही. कमलपुष्पाची प्रतिमा (उपमा) योजून ते आपली अलिप्तता स्पष्ट करतात. ''तुझी प्रेम खूण देऊनिया'' मला लौकिकातून अलिप्त राहण्याची शक्ती दे, असे ते विठ्ठलाला कळवळून सांगतात. माझे मन तुझ्यातच रमले पाहिजे. दुडीवर दुडी ठेवून पाणी आणणाऱ्या त्या गुजरीप्रमाणे मी तुझ्या रूपातच रमण्याचा प्रयत्न करतो. प्रपंचात राहूनही मी तुझ्याशी मनाने एकरूप होतो. ''तुझी प्रेमखुण देऊनिया'' माझ्या मनाला लौकिकातून बाहेर पडून 'जाणोनि नेणते' कर. ज्ञानदेव-तुकारामांच्या निष्काम कर्मयोगपर भक्तीला विशेष महत्त्व आहे. या अवस्थेत संसारच भक्तिरूप धारण करतो. (अवघाचि संसार, याचा विचार नंतर करू.) घार आकाशात संचार करीत असते पण तिचे लक्ष घरट्यातील पिलांकडे असते. संतांच्या सहवासाने आपले व्यक्तित्व पूर्ण बदलून गेले याची आता त्यांना जाण आली. चंदनाच्या सानिध्यात बोरीलाही चंदनाचा सुगंध येतो. विठ्ठलाच्या प्रेमभक्तिसाम्राज्यात वर्ण, जाती, गुण, दोष हे भेद राहातच नाहीत. ''तुका म्हणे आले सर्मथांच्या मना । तरी होय राणा रंक त्यांचा ।।'' (ज्ञानदेवांनीही हे सत्संगाचे माहात्म्य चंदनाच्या प्रतिमेतच सांगितले आहे ''चंदने वेधली झाडे । जालीं चंदनाची नि पाडे'' पण समार्थांच्या (विठ्ठलदेव) मनात अद्यापी हा विचार येत नव्हता. त्यामुळे तुकाराम अस्वस्थ होते. तुकाराम आता व्यक्तिगत दु:खातून-दैन्यावस्थेतून बाहेर पडून एकूण सामाजिक परिस्थितीचे निरीक्षण करून एका उच्च नैतिक पातळीवर जाण्याचा प्रयत्न करू लागले होते. विठ्ठलाला शरण जाणे हाच एक मार्ग आहे हे पाहून तुकोबा देवाकडेच साकडे घालतात. देवाला अतिशय प्रेमळ मनोवृत्तीने पण विठ्ठलाच्या भेटीसाठी अगदी कळवळून आवाहन करतात. मातेलाच जणु ते पाचारण करतात :

येई गे विठ्ठले जीवन कले ।
सुंदर घननीळे पांडुरंगे ।।

येई गे विठ्ठले करुणा कल्लोळे ।
जीव कळवळे भेटावया ।।
न लागती गोड आणिक उत्तरें ।
तुझे प्रेम झुरे भेटावया ।।
तुका म्हणे धाव घाली कृष्णाबाई ।
क्षेम चहुबाहीं देई मज ।।
आरूष शब्द बोले मनी न धरावे कांही ।
लडिवाळ बालकें तूंचि आमची आई ।।
देई गे विठाबाई प्रेमभातुकें ।
अवघिया कवतुकें लहानाथोरा ।। (सकळ)

तुकोबांच्या लाडिवाळपणे केलेल्या आर्जवी आवाहनाला विठ्ठल काही दाद देत नाही, हे पाहून तुकोबा देवाला-पांडुरंगालाच आर्त मनाने, काहीशा त्राग्याने म्हणतात, 'तेरा दिवस जाले निश्चक्र करून (कडकडीत) उपोषण करून पाडुरंगा (पांडुरंग माये) तू काहीच प्रतिसाद देत नाहीस',

पाषाणाची खोळ घेऊनि बैसलासी ।
काय हृषीकेशी जालें तुज ।
तुजवरी आता प्राण मी त्याजीन ।।
हत्या मी घालीन पाडुरंगा ।।

(तू पांघरलेल्या दगडाच्या खोळीवर डोके आपटून आत्महत्या करीन.)

फार विठाबाई धरिली तुझी आस । करीन जीवा नास पांडुरंगा ।।
तुका म्हणे आता मांडिले निर्वाण । प्राण हा सांडीन चंद्रभागे ।।

पण थोडे शांत होऊन तुकाराम विठ्ठलाला म्हणतात : मला काही तुमच्याकडे मागणी करण्याचा उबग आलेला नाही. पण भक्ताचा उद्धार करण्याविषयीचा तुमचा जो लौकिक आहे, कीर्ती आहे, त्या कीर्तीला डाग लागता कामा नये, तुमच्या कीर्तीचे जतन केले पाहिजे हे न झाल्यास तुमची अपकीर्ती होईल याचे दुःख होते. तुमच्या नामाची जपणूक न होता मनाला दुःख होईल, एवढेच नव्हे तर तुमची निंदा स्वामींच्या कानावर पडू नये या साठी मी आक्रोश करतो आहे. ''तुका म्हणे लाज । आम्हां स्वामीचें तें काज'' पाहा. तू जर आम्हाला दर्शन दिले नाहीस तर लोक म्हणतील की पाषाणाचा बुरखा पांघरून बसलेल्या या हृदयशून्य देवाला, विठ्ठलाला आमचे आर्त रुदन कसे ऐकू येईल? पाषाणाची खोळ या एक१दोन शब्दांत किती प्रभावी अर्थ व्यक्त केला जातो! या प्रतिमेत तुकारामांचे शब्दवैभव दिसून येते. पाषाणाचा बुरखा ही प्रतिमाच इतकी अर्थपूर्ण आहे की जर विठ्ठलाला कान असतील तर तो तुकोबांच्याकडे

धावत येईल. पण पाषाणाचा बुरखा त्याने पांघरला असल्याने भक्ताचे आक्रंदन त्याला दिसणार नाही; पण ऐकू तर येऊ शकेल. पण तेही शक्य नाही. म्हणून तुकाराम आत्मार्पण करण्याचा विचार करतात. आता या पायरीवर तुकाराम देवालाच म्हणतात 'देवा तूच पाहा मला काही नको' तुझ्या नावाला कमीपणा येईल, तुझ्या कीर्तनाला कलंक लागेल. मी आत्महत्या केली तर तुझी निंदा होईल. तुमच्या नामाच्या माहात्म्याचे जतन झाले पाहिजे. हे न झाल्यास मनाला अती दुःख होईल.

माझा मज नाही । आला उबग तो काही ।।
तुमच्या नामाची जतन । नव्हं ती थोर वाटे सीण ।।
न पडावी निंदा । कानी स्वामीची गोविंदा ।।
तुका म्हणे लाज । आम्हां स्वामींचे तें काज ।।''

तुकाराम आता निर्वाणीचे शब्द देवाला ऐकवत आहेत. यानंतर पधंरा दिवसात साक्षात्कार झाला आणि विठ्ठलाची निराकार भेट झाली. येथे त्यांना आत्मसामर्थ्याचा साक्षात्कार झाला.

आता मी सर्वथा नव्हे गा दुर्बळ । यातिहीन कुल दैन्यवाणा ।।
माय रखुमाई पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ।।
बापुडा मी नव्हे दुर्बल ठेंगणा । पांगिला हा कोणा आणिकांसी ।।
दृष्टा नव्हें आम्ही अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ।।
संवसार आम्हां सरला सकळ। लपोनियां काळ ठेला धाकें ।
तुका म्हणे जालों निर्भर मानसीं । जोडलिया रासी सुखाचिया ।।

एका सुंदर अभंगात आपल्या 'जीवाचे जीवन ' विठ्ठल निधान सापडल्याचा आनंद तुकाराम व्यक्त करतात–

पाहतां श्रीमुख सुखावले सुख । डोळियांची भूक न वजें माझी ।।
जिव्हे गोडी तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढे ।।
श्रवणीची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद निवारुनी ।।
महामळें मान होते जें गोंदले । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसे ।।
तुका म्हणे माझ्या जीवाचे जीवन । विठ्ठल निधान सांपडले ।।

विठ्ठलाचे निराकार दर्शन झाले असले तरी प्रत्यक्ष भेट झाल्याशिवाय त्यांचे मन शांत होत नव्हते. संत-सत्पुरुषांच्या संगतीने देवाची भेट होईल असा विचार मनात आल्याने तुकाराम संतांची,हरिभक्तांची संगत शोधू लागले. जीव कासावीस झाला.

सुफळ हा जन्म होईल तेथून ।
देता आलिंगन वैष्णवांसी ।।

तुका म्हणे तोच दिन सोहाळा ।
गाऊं गोपाळा धरणीवरी ॥

बाबांनी (एवढेच स्वत:चे नाव त्यांनी स्वप्नात सांगितले.) 'राम कृष्ण हरि' हा मंत्र दिला होता. बाबा या पलीकडे बोलले नाहीत. फक्त भोजनासाठी पावशेर तूप त्यांनी मागितले आणि घाईघाईने निघून गेले. (हे सर्व स्वप्नात घडले.) सद्‌गुरूंनी मस्तकावर हात ठेवून देवाच्या (विठ्ठल) भेटीचा मार्ग दाखवला. 'राम कृष्ण हरी' हा मंत्र दिल्यामुळे पुढील मार्ग दिसू लागला, पण सद्‌गुरूंची (बाबा) सेवा करता आली नाही. बोरीच्या झाडाला चंदनाच्या सुगंधाने व्यापले. 'चंदन आणि बोरी' या अप्रतीम प्रतिमेतून तुकारामांना संतांचे माहात्म्य उत्कटतेने जाणवले. बाबांकडून मिळालेल्या मंत्रातून विठ्ठलाची प्रत्यक्ष भेट होणार अशा विश्वासातून ते आता विठ्ठलाच्या दिशेने निघाले. अनेक वेगवेगळ्या प्रतिमांच्या माध्यमांतून ते आपला भाव व्यक्त करतात. यातील काही भावपूर्ण अभंग पाहू. पतिव्रतेची भारतीय संकल्पना स्त्रीच्या उत्कट प्रेमभावनेची, निष्ठेची द्योतक आहे. तुकारामांना विठ्ठलाशिवाय अन्य काहीच दिसत नाही. आपली ही भावना व्यक्त करण्यासाठी ते प्रथम पतिव्रतेची संकल्पना आणि अन्य दोन-तीन काव्यात्म सुंदर उपमा वापरतात. तुकारामांची विठ्ठलाला भेटण्याची तीव्र उत्कट भावना तीन प्रतिमांतून अतिशय प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. पहिल्या प्रतिमेत स्त्रीची पतिविषयक उत्कट निष्ठा व्यक्त होते, तर 'सूर्यविकासिनी कमल चंद्रकलेला भुलणार नाही' या प्रेमातील निष्ठा आणि नैसर्गिक ओढ (अटळ) या प्रतिमांतून वाचकाच्या मनाला जाऊन भिडते.

''कन्या सासुरासि जाये । मागे परतोनी पाहे ॥'' यातील माता-पित्याची ओढ नैसर्गिक आहे. ही नाजुक भावना बालपणापासून जडलेले प्रेम कन्येलाही बाजूला सारणे शक्य होत नाही. सासरी म्हणजे पतीच्या घरी जाणे हेही अपरिहार्य असते. बालवयातील कन्येच्या मनातील कोमल नाजुक भावनांच्या अपरिहार्य संघर्षाची सूक्ष्मता ध्यानात घेतल्यास या अभंगाचे सौदंर्य आणि भावनेची कोमलता प्रत्येक स्त्रीला आणि पुरुषालाही जाणवल्याशिवाय राहणार नाही. अभंगाच्या उत्तरार्धात अप्रतिम अशा प्रतिमेने मूळ भावनेचे पोषण होते.

चुकलिया माये बाळ हुरू हुरू पाहे ।
जीवनावेगळी मासोळी तैसा तुका तळमळी ॥

शब्दांच्या विशिष्ट कोमल रचनेने, माता आणि तिचे बालक यांच्या कोमल प्रेमभावनेने पुढील अभंग सर्व मराठी भाषिकांचा आवडता अभंग झाला आहे.

वाटुली पाहाता सिणले डोळुले । दाविसी पाउले कैवो डोळा ॥
तू माय माउली कृपेची साउली । विठ्ठले पाहिली वाट तुझी ॥

तुका म्हणे माझ्या आसावल्या बाह्या । तुज क्षेम द्याया पांडुरंग ।।

शब्दबाणांनी दुर्जनांशी लढणाऱ्या तुकोबांनी येथे मातेविषयीचे लेकराचे कोवळे प्रेम बालकाच्या अतिशय उत्कट आणि भांबावलेल्या भाषेत (हुरू हुरू) मूर्तिमान उभे केले आहे. शब्दबाणांनी लढणारे तुकाराम किती कोमल भाषेत माताबालक संबंधात आपले भाव व्यक्त करीत आहेत !

पुढील अभंगात तुकाराम काव्यसौंदर्याच्या सृष्टीतच रममाण झाले आहेत. आपल्या सर्व कल्पना येथे निर्सगाच्या चित्तवेधक शैलीतच व्यक्त करीत आहेत :

हरिनामवेली पावली विस्तार
फळी पुष्पी भार वोल्हावली
तेथे माझ्या मना होई पक्षिराज
साघावया काज तृप्तीचें या
मुळीचिया बीजें दाखविली गोडी

फळाफुलांनी बहरलेला वृक्ष आणि त्या वृक्षाचे बीज यांची एकात्मता (अद्वैत) सूचित केली आहे.

वारकरी संप्रदायाचीच ही हरिनामवेली विस्तारली आहे. फुलांनी, फळांनी वृक्षवेली बहरून गेल्या आहेत. तुकाराम आपल्या मनाला सांगताहेत की, "मना हरिनाम वेली सर्वत्र विस्तारली आहे, तू आता या वेलीवर पक्षिराज होऊन सर्वश्रेष्ठ असे आनंद वैभव प्राप्त करून घे, तृप्तीचा आनंद अपूर्व आहे, विलंब करू नको", "तुका म्हणे क्षणक्षणां जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ".

दुसरा अभंग याहीपेक्षा अधिक सुंदर आहे. तुकाराम साधक अवस्थेत असताना निर्सगाच्या सान्निध्यात जाऊन तपश्चर्या करीत. कारण मानवी जीवनातील गुणदोष येथे नसतात.

वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे
पक्षी ही सुस्वरें आळविती
येणें सुखें रुचे एकांताचा वास,
नाही गुणदोष अंगा येते

मानवी सृष्टीतील अहंता, क्रोध, मद-मत्सर, स्वार्थ हे सर्व दोष या निसर्गसान्निध्यात लुप्त झालेले असतात. तपश्चर्येला यासारखे अन्य एकांत स्थल कोठे मिळेल! येथील वनचर सुद्धा आमचे सोयरे आहेत. पक्षी मधुर स्वरांत गान करीत असतात. वृक्षवल्ली हीसुद्धा आमची सोयरीच आहेत. तपश्चर्येला असे निवांत आनंददायक स्थळ अन्यत्र कोठे आढळणार? बैठकीचे विशाल रूप एका सुंदर आणि भव्य प्रतिमेच्या माध्यमातून शब्दांकित केले आहे.

आकाश मंडप पृथिवी आसन,
रमे तेथे मनक्रीडा करी
कथा कमंडलु देह उपचारा
जारवितो वारा अवसरू
हरिकथा भोजन परवडी विस्तार
करोनि प्रकार सेवू रुची

अशा वृक्षवल्ली वनचरांच्या सान्निध्यात संवाद, विचार-विनिमय कसा साधणार? तुकाराम याला उत्तम मार्ग सांगतात :

तुका म्हणे होय मनासी संवाद
आपुलाचि वाद आपणासीं ।।

पृथ्वीवरील भव्य मंडप आणि विश्वाची अगाध भव्यता या प्रतिमेने चिंतनमग्न तुकोबा लौकिक जगातून मुक्त होऊन विश्वरूप झाले. अशा मुक्तावस्थेत ते आत्मचिंतन (स्वत:शीच संवाद) करू लागले. मन हे ओढाळ आहे, ते कोणीकडेही भरकटते. अन्य व्यक्तींशी चर्चा, विचार-विनिमय करायचा तर अहंकार जागृत होतो; विचार-विनिमय प्रांजल होत नाही. जेव्हा आपल्या स्वत:शीच संवाद साधणे हे महत्त्वाचे असते, तेथे जेता आणि पराभूत यांचा संवाद नसतोच. मन:शांती आपणच आपल्याशीच संवाद करून मिळवायची असते. ही प्रक्रिया म्हणजेच आत्मचिंतन. तुकारामांनी भामगिरीच्या डोंगरावर वास्तव्य करून, निर्सगाच्या सान्निध्यात राहून आत्मचिंतन केले. येथेच त्यांना आत्मज्ञान झाले. विराट आकाश-पृथ्वीच्या भव्य मंडपात त्यांना अनंत विश्वाची जाणीव झाली. त्यांच्या अहम्‌चा लोप झाला. या विशाल, भव्य जाणिवेतून अंतिम सत्याची जाणीव झालेले महान व्यक्तिमत्त्व उदयाला आले. आता तुकाराम विठ्ठलाशी धीटपणे संघर्षही करतात, युक्तिवादही करतात. विठ्ठलाला ते सांगतात :

जरी मी नव्हतो पतीत । तरि तूं पावन कैचा येथ ।।
म्हणोनि माझे नाम आधी । मग तू पावन कृपानिधी ।।
लोहो महिमान परिसा । नाहीतर दगड जैसा ।।
तुका म्हणे याचक भावें । कल्पतरू मान पावें ।।

विठ्ठलाने बालरूपात येऊन तुकारामांचें समाधान केले :

माझे केले समाधान रूप गोजिरे सगुण ।
निववि‍लें मन आलिंगन देऊनी ।।

अनेक सुंदर आणि कोमल शब्दांच्या माध्यमातून तुकाराम देवाकडे क्षमायाचना करतात:

तू माउलीहून मायाळ, चंद्राहूनि शीतळ
पाणियाहूनि पातळ, कल्लोळ प्रेमाचा देऊ
कशाची उपमा दुजी तुज पुरुषोत्तमा ।
ओवांळूनि नामा तुझ्या वरूनि टाकिलों
तुंवा केलें रे अमृता गोड त्याही तूं परता ।

कोणतीच उपमा आता मी तुला देऊ शकत नाही, तरी पुन्हा ते विठाई माईला-माउलीला आवाहन करतात, (तुका म्हणे माझी विठ्ठल माऊली.)

पुढील एक अभंग अतिशय महत्त्वाचा आहे. तुकोबा म्हणतात, ज्यांना अरूप-निर्गुण देव हवा त्यांना अरूप दे. पण माझा जीव तुझ्या पावलात गुंतला आहे. विठ्ठलाला निर्भयपणे तुकोबा सांगतात, देवा तुम्ही मला मोक्षाच्या मोहात गुंतवू नका. मला ब्रह्मज्ञान नको. मला यात गुंतवण्याचा प्रयत्न चालला आहे :

घेशील वेढे मुक्तीच्या अभिलासे । चाळवी जा पिसे ब्रह्मज्ञान ।।
तुका म्हणे माझा भक्तिरस । पाडावया ओस चाळविशी ।।

ते म्हणतात, हा तुझा विचार मला चाळविणारा-फसवणारा, चाळवाचाळव करणारा आहे. मला यातील काही नको, मला प्रेम, भक्ती दे :

मी भक्त तूं देव ऐसें करी ।
दावी रूप मज गोपिका रमणा ।।
ठेवीन चरणावरीं माथा ।
पाहोनि श्रीमुख देई आलिंगन ।।
जीवे निंबलोण उतरेन ।
पुसता सांगेन हितगुज मात ।।
बैसोनि एकांत सुखगोष्टी
तुका म्हणे यासीं न लावे उशीर
माझे अभ्यतंर जाणोनिया ।।

तुकारामांच्या पुढे असलेल्या निर्गुण तत्त्व व सगुणभक्ती या कल्पना येथे अभिप्रेत आहेत. विठ्ठलाला ते कळवळून सांगतात, 'आत्मसुखापेक्षा मला भक्तिसुख अधिक प्रिय आहे.' विठ्ठलाचे रूप आणि त्याचे सौंदर्य पाहून तुकाराम भारावून गेले. येथे त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. या अभंगात मूर्तरूपाने दिसलेल्या विठ्ठलमूर्तीच्या सौंदर्याने तुकाराम मोहून गेले; विश्वप्रकाशक दिव्य तेजाने मूर्तरूपात दिसू लागलेल्या विठ्ठलाशी तुकाराम तद्रुप झाले. "समदृष्टि समाधि तुकया लागला पायी". या उन्मनी अवस्थेचे स्वरूप पाहून साधक अवस्थेतील तुकारामांच्या जीवनातील आर्तता, कारुण्य,

जीवनावेगळी मासोळीची तडफड, तगमग यामुळे होणारी मन:स्थिती आता शांत होते. या घटकेचे तुकोबांनी जे अपूर्व काव्यमय वर्णन केले आहे ते पाहून नंतर तुकोबांच्या समाजप्रबोधन कालखंडाकडे वळू.

घवळले जगताकार । अंधार तो निरसला ।।
लपों जातां नाही ठाव । प्रगट पाहे पसारा ।।

संपूर्ण विश्वाला तेजोमय करणाऱ्या या अभूतपूर्व प्रकाशाचे वर्णन करणे अशक्य आहे असे ते म्हणतात. खऱ्या अर्थाने आज साक्षात्कार झाला असे आता ते सांगतात. स्वत:चे लौकिक जीवन आता संपले. आता ज्ञात वास्तवाच्या पलीकडे ते प्रयाण करताहेत. ''तुका म्हणे जिवें साटी । पाडिली मिठी धुरसी ।।''

तुकाराम आपणाला आलेली अनुभुती पुढील अभंगात सांगतात :

स्थिरावली वृत्ती पांगुळला प्राण ।
अंतरीची खूण पाउनिया ।।
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मिळित ।
कंठ सद्गदित रोमांच आले ।।
चित्त चाकाटले स्वरूपामाझारी ।
न निघे बाहेरी सुखावलो ।।
सुनील प्रकाश उदैजला दिन ।
अमृताचे पान जीवनकळा ।।
शशिसूर्या जालीं जीवें ओवाळली ।
आनंदा दाटणी आनंदाची ।।
तुका म्हणे सुखें प्रेमासी डुलत ।
विरालों निश्चित निश्चितेने ।। (४१५९)

साधकदशेच्या अंधारातून आता तुकाराम बाहेर पडले. मन शांत झाले. आत्मानंदाची अंतरीची खूण पाहून नेत्र अर्धवट उघडले (अर्धोन्मिलित). कंठ सद्गदित झाला. शरीर रोमांचित झाले. चित्त या नव्या अद्भुत दर्शनाने चकित झाले. या सुखावलेल्यामन:स्थितीतून बाहेर पडण्याची इच्छाच होईना. सतराव्या जीवनकलेतून स्रवणाऱ्या अमृताचे पान सुरू झाले. शशिसूर्य (इडा आणि पिंगळा) या नाड्यांची जीवात्म्याला ओवाळणी झाली–ऐहिक जीवनाची जाणीवच लोप पावली. सर्व व्यक्तित्व आनंदमय झाले. आनंदाला आनंदाचीच दाटणी झाली. (ही सर्व परिभाषा योगसाधनेतून आली आहे. ज्ञानेश्वरी अ. ६ पाहा.) ही आत्मानंद अवस्था तुकाराम या काळात लिहिलेल्या अनेक अभंगांत व्यक्त करतात. खालील दोन अभंग पाहा :

अंतरीची ज्योती प्रकाशली दीपली ।
मुळीची जे होती आच्छादिली ॥
तेथीचा आनंद ब्रह्मांडि न माये ।
उपमेशी काय देऊ सुखा ॥
भावाचे मथिले निर्गुण संचले ।
ते हे उभे केले विटेवरी ॥
तुका म्हणे आम्हा ब्रह्मांड पंढरी ।
प्रेमाची जे थोरी साठवण ॥ (२८३७)

डोळियांचे दैव आजि उभे ठेले ।
निधान देखिले पंढरीये ॥
काय ते वानावे वाचेचे पालवे ।
वेदा न बोलवे रूप ज्याचें॥
देखता रंगले चित्त माझें ॥
तुका म्हणे मी तों सगळाच विरालो ।
विठ्ठलचि जालों दर्शनाने ॥

विठ्ठलाचे रूपवर्णन करणे अशक्य होते. रूप पाहून होणारा आनंद आपणाला अनुभवता येईल. पण ही अमूर्त आनंदकल्पना डोळ्यांना कशी दिसावी? लोह, सुवर्ण यांची मूर्ती करण्यासाठी ते धातू वितळवतात. येथे आनंदाचा रस करून हा आनंदरस मूर्तीच्या साच्यात ओतला जाऊन घनरूप मूर्ति आपल्यासमोर उभी राहिली आहे. ही आनंदरसाच्या घनरूप मूर्तीची कल्पना अभिनव आहे.

हे तीन-चार अभंग संपूर्ण स्वरूपात येथे जाणीवपूर्वक दिले आहेत. हे अभंग प्रत्यक्ष वाचल्याशिवाय तुकारामांच्या मानसिकतेची कल्पना येणार नाही. या तीन-चार व अन्य काही अभंगांत तुकाराम अतिशय सुंदर शब्द, कल्पना, प्रतिमा यांच्या माध्यमांतून आपली मुक्तावस्था सांगतात. त्यांचा हा अनुभव बाह्य सुखाचा नव्हे. या अवस्थेत माणूस पूर्णपणे अंतर्मुख होतो. ज्ञानदेवांनी सहाव्या अध्यायात वर्णन केले आहे. अंतर्मुखतेने बाह्यवृत्ती पूर्ण मावळतात. बाह्यवृत्तींची ओढ संपलेली असते. सामान्य माणसाला ज्ञानी माणसाचे अनुभव समजत नाहीत. या अवस्थेचा योगशास्त्रात 'कुंडलिनी जागृत करण्याचा प्रयोग' असा गूढ शब्दांत अर्थ सांगितलेला आहे. या गूढ भाषेत तुकाराम आपल्या अंत:स्थितीचे वर्णन करीत आहेत.

### तुकारामांचे तत्त्वचिंतन आणि भक्तिविचार

अवघाचि संसार केला ब्रह्मरूप । विठ्ठल स्वरूप म्हणोनिया ॥
भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्या संगे सुख भोगी ॥

एका अंगी दोन्हीं जालीं ही निर्माण । देवभक्तपण स्वामी सेवा ॥
तुका म्हणे येथे नाहीं भिन्न भाव । भक्त तोचि देव देव भक्त ॥

तुकाराम भक्तिमार्गी असले तरी ते द्वैत भक्तिमार्गी नाहीत. कर्नाटकातील माध्व भक्तिमार्गी पूर्ण द्वैतवादी आहेत. असा हा द्वैतभक्तिविचार ज्ञानदेव-तुकारांमानी सांगितलेला नाही. त्याबरोबरच ते शुद्ध वेदान्ती अद्वैतवादीही नाहीत, तर ते ''एका अंगी दोन्ही जाली ही निर्माण'' या ज्ञानदेवांच्या 'अमृतानुभवा'तील देवो-देवीप्रमाणे आहेत.

किं भक्तिसुखालागी । आपणाचि जालां दों भागी ।
वाटूनियां आण । सेवक बाणे ( ज्ञा.१२.१८६)

अमृतानुभवाच्या नवव्या प्रकरणात देव आणि भक्त हा भेदच राहात नाही.

जाला देवोचि भक्तु । ठावोचि जाला पंथु ।
होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हे ॥ ( अमृ. ९.३५)

तुकारामांचा भक्तिविचार याच जातीचा आहे. शेवटी दोघेही विश्वात्मक परमात्मा एकच मानतात. तुकारामांनी भक्तिसुखासाठी, प्रेमभक्तीसाठी परमात्माची दोन रूपे, देव आणि भक्त ही मागून घेतली. प्रारंभी उद्धृत केलेल्या अभंगात ''एका अंगी दोन्ही जालो'' हे मूलतः अद्वैतवादाचे तत्त्व तुकारामही मानतात. (खरे म्हणजे सांख्यांच्या प्रकृती आणि पुरुष या दोन तत्त्वांपासून विश्वनिर्मिती झाली अशी कल्पना होती. यातूनच अद्वैतवादाचा विकास झाला.) तुकारांमाचा भक्तिविचार द्वैताधिष्ठित मानणे योग्य नाही. प्रेमभक्तीसाठी त्यांनी देव आणि भक्त भिन्न कल्पून हे भक्तितत्त्वज्ञान विकसित केले. तुकाराम केवळ तत्त्वचिंतक नव्हते. त्यांच्यापुढे समाजातील दुःखे भोगणारा मानवसमूह स्पष्ट दिसत होता. त्यांचे दैन्य, दुःख दूर करण्यासाठी–निदान ते दैन्य, दुःख सुसह्य करण्यासाठी तुकारामांनी आपल्या तत्त्वचिंतनाला मानवतावादाचे रूप दिले.

जे का रंजले गांजले ।
तयासी म्हणें जो आपुले ।
तोच साधु ओळखावा ।
देव तेथेचि जाणावा ॥ (संपूर्ण अभंग अन्यत्र दिला आहे.)

जगाच्या कल्याणी संताच्या विभूती ।
देह कष्टावती । उपकारें ॥

संतांची कल्पना सांगायची तर व्यवहारात दिसणारे द्वैत मानावे लागते. अंतिम अवस्था अद्वैतच असल्याचे तुकाराम मानतात. वेदांत्यांच्या कल्पनेत अद्वैतवाद प्रस्थापित करण्यासाठी विवर्तवादाचा उपयोग केला जातो. विश्व हा आभास आहे. (ब्रह्म सत्यं

जगन् मिथ्या) येथे काश्मिरी शैववादातून आलेला चिद्विलासवाद हा अंतिम तत्त्व म्हणून ज्ञानेश्वर-तुकाराम स्वीकारतात. विश्व, विश्वातील द्वैत हे सर्व मान्य करावे लागते. पण हे द्वैत एकाच चित्तत्त्वाचा विलास आहे. (चिद्विलासवाद). तुकाराम एका ठिकाणी म्हणतात:

"अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं " हा त्यांचा आग्रह भक्तिसुखासाठी आहे. मोक्षावस्थेत द्वैत नसल्याने ते मोक्षालाही नकार देतात. "नलगे मुक्ती धनसंपदा ....". पण तुकाराम स्वत: शुद्ध तात्त्विक दृष्टया द्वैत मानत नाहीत. विश्वातील सर्व द्वैत-अद्वैतभाव एका देवानेच-विठ्ठलानेच व्यापले आहेत. "द्वैताद्वैतभावें । अवघें व्यापियलें देवें । चित्त चैतन्यी पडता मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टी ।". अवघ्या विश्वात विश्वंभरच भरून राहिला आहे. जग ही जगदात्म्याची प्रभा आहे. (जग आभास नाही) परमेश्वराच्या प्राप्तीसाठी कोठेतरी रानावनात जाऊन जप-तप-पूजा-अर्चा करत बसण्याची आवश्यकता नाही.

झाकोनिया नेत्र काय जपतोसी । जरी नाही मानसी प्रेमभाव
रामराम म्हणा उघड मंत्र जाणा । चुकती यातना गर्भवास ।
मंत्र यंत्र संध्या करिसी जडीबुटी । तेणे भूतसृष्टी पावसील
तुका म्हणे ऐका सुंदर मंत्र । एक भवसिंधुतारक रामनाम

संतवाङ्मयाचे श्रेष्ठ अभ्यासक गुरुतुल्य प्रा. गं. बा. सरदारांनी याविषयी मांडलेले मौलिक विचार येथे देत आहे. ते म्हणतात, "चैतन्य स्वतं:सिद्ध व - स्वसंवेद्य आहे. आपली वृत्ती निवळली, बुद्धी स्थिर झाली, जडतेचा निरास झाला की प्रपंचच परमार्थ बनतो. 'अवघाचि संसार परब्रह्मरूप । विठ्ठलस्वरूप म्हणोनि या' अशी त्यांची विचारसरणी होती. अद्वैत आणि भक्ती यांमध्ये तम:प्रकाशवत विरोध आहे असे मराठी संतांनी कधीच मानले नाही. म्हणून "अद्वैताची वाणी । नाही ऐकत मी कानी" असे तुकाराम जेव्हा म्हणतात तेव्हा तें द्वैत मताचा अवलंब करतात असे मानण्याचे कारण नाहीं. भक्तिप्रेमसुखाला पारख्या झालेल्या रुक्ष आणि नीरस अशा केवळ अद्वैताचे (वेदांत्यांचे) त्यांना वावडे होते. परमात्मतत्त्व सगुण आणि निर्गुण, द्वैत आणि अद्वैत या द्वंद्वांच्या अतीत आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. भक्तीसाठी कल्पिलेले द्वैत हे अखेर सामरस्याचा, अद्वैताचा परिपोष करणारे असल्यामुळे त्यांना अधिक गोड आणि गोमटे वाटत होते." (प्रा. गं. बा. सरदार- तुकारामदर्शन-प्रस्तावना) याचे अति सुंदर वर्णन अमृतानुभव या ग्रंथात ज्ञानेश्वरांनी केले आहे. वेदांत्यांच्या विचाराप्रमाणे भक्ती ही अंतिम अवस्था नव्हे. ब्रम्हज्ञान ही अंतिम अवस्था प्राप्त होण्यासाठी चित्तशुद्धीसाठी भक्ती आवश्यक आहे. ब्रह्मज्ञान होताच भक्तीचे कार्य संपले. त्यांच्या (वेदांत्यांच्या) मते भक्ती हे साधन आहे. तुकाराम हे वेदान्त मत मान्य करीत नाहीत.

घट-पटाच्या मांडणीत प्रेमभाव कसा बसू शकेल? प्रेमभक्तिशिवाय ब्रह्मज्ञानाचा सिद्धांत तुकाराम कानावरही पडूही देणार नाहीत. तुकारामांच्या तत्त्व-चिंतनाला भावरूप लाभते ते या प्रेमभक्तीच्या कोमल स्पर्शाने. देवभक्तपण महत्त्वाचे आहे. तुकाराम वेदान्त तत्त्वज्ञान स्वीकारतात, पण त्याला आपल्या भक्तीच्या चौकटीत बसवतात. विठ्ठलानेच आम्हाला वेदांचा अर्थ सांगितला असे ते स्पष्टपणे सांगतात. याचा विचार नंतर करू. प्रस्तुत संदर्भात तुकाराम अगदी परखड शब्दांत सांगतात, 'अद्वैत तत्त्वज्ञानाचा अर्थ भक्तीच्या संदर्भातच सांगितला पाहिजे'. ते म्हणतात :

नाइकावे कानी तयाचे ते बोल । भक्तावीण फोल ज्ञान सांगे ।।
वाखाणी अद्वैत भक्ति भावेविण । दु:ख पावे सीण श्रोता-वक्ता ।।
अहं ब्रह्म म्हणोनि पाळीतसे पिंडा । न बोलावे भांडा तया सावे ।।
वेदबाह्य लंड बोले जो पाखंड । त्याचे काळे तोंड संतांमध्ये ।।
तुका म्हणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठ त्याहुनि श्वपच तो ।।

भक्तिविना अद्वैत हे तुकाराम मुळीच मान्य करीत नाहीत. तुकाराम वेद मानतात, पण त्या वेदांचा अर्थ त्यांच्या विठ्ठलाने त्यांना जो सांगितला तोच ते मानतात. 'वेदांचा अर्थ आम्हांसीच ठावा' याचे स्पष्टीकरण देताना ते विठ्ठलाचाच आधार घेतात. तुकाराम स्वत:ची जात शूद्र म्हणून अनेकवेळा सांगतात. पण वेदाला स्पर्श करण्याचाही अधिकार शूद्रांना नाही. या सर्व अन्याय्य विचाराविरुद्ध तुकाराम बंड करतात आणि संकुचित वर्ण-जातिव्यवस्थेचा धिक्कार करतात. विठ्ठलानेच वेदांचा अर्थ आम्हाला सांगितला आणि तो अर्थ थोडक्यात असा :

वेद अनंत बोलला ।
अर्थ इतुकाचि शोधिला ।
विठोबासी शरण जावे ।।

(हे कोणता वेदान्ती मान्य करील?) तुकोबांनी केलेली सांस्कृतिक क्रांती ती हीच! तुकारांमानी वेद घेतला; पण वेदांचा संपूर्ण आशय पूर्णपणे बदलून टाकला. तुकारामांनी स्वत: नव्हे, विठ्ठलानेच त्यांना हा विचार सांगितला आहे. माझे बंधू पां. वा. गाडगीळ वेदान्त तत्त्वज्ञानाविषयी एकदा म्हणाले,It is a polite way of denying God." याच सुरात तुकारामांच्या वेदविषयक बंडखोरीबद्दल म्हणता येईल की, "It is a polite way of denying the authority of vedic literature."

**तुकाराम आणि वेदवाङ्मय**

वेद अनंत बोलला । अर्थ इतकचि साधिला ।
विठोबासी शरण जावे । निजनिष्ठा नाम गावें ।
सकळ शास्त्रांचा विचार । अंती इतकाची निर्धार।।

अठरा पुराणी सिद्धांत । तुका म्हणे हाचि होत ।।
तुका होवोनी निराळा । क्षरा अक्षरा वेगळा ।
पाहे निगम कळा । बोले विठ्ठलप्रसादे ।।

प्राचीन भारतात ज्या काळी वर्ण-जातिव्यवस्था प्रस्थापित झाली, तेव्हापासून उच्च ब्राह्मणवर्णीय आणि शोषित कुणबी अथवा शूद्र समाज यांच्यामध्ये सतत संघर्ष चालू होता. वैदिक आर्यांचीं यज्ञ संस्कृती, त्याबरोबरच पुरुषसूक्तात सांगितलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि त्यातूनच प्रस्थापित झालेली जातिव्यवस्था या घटना भारताच्या सांस्कृतिक ,सामाजिक उच्चनीचतेला कारणीभूत झाल्या. उच्चवर्णीय ब्राह्मण-क्षत्रिय यांची निरंकुश सता सर्व समाजावर प्रस्थापित झाली. या व्यवस्थेला धार्मिक-सांस्कृतिक आणि हळूहळू दैवी शक्तीचे अधिष्ठान प्राप्त झाले. वर्णव्यवस्था-जातिव्यवस्था अपरिवर्तनीय झाल्या. याचा काही विचार या प्रकरणाच्या प्रारंभी केला आहे. तुकाराम हे स्वत:ची जात शूद्र असे मानतात. वेदवाङ्मयाचे वाचन शूद्रांना करता येत नाही. यातूनच उच्चवर्णीय वेदपाठक आणि वेदवाचनाचा अधिकार नसलेले कनिष्ठवर्णीय यांचा सतत संघर्ष होत असे. पण तुकारामांची तपश्चर्याच इतकी प्रखर झाली कं विठ्ठलाने स्वत:च तुकारामांना वेदांचा अर्थ समजून सांगितला, असे ते सांगतात. वरिष्ठ वर्णीयांच्या धर्मविचाराला एका 'शूद्र' संताचे आव्हानच होते. परंपरेने चालत आलेल्या वेदान्त तत्त्वज्ञानाला प्रत्यक्ष धक्का न लावता वेदाचा खरा अर्थ आम्हालाच समजतो, तुम्ही सर्व वेदांचे मर्म न समजता केवळ घोकंपट्टी करता आहात, असे ते वरिष्ठ वर्णीय ब्राह्मणांना सांगतात. वेदांचे रहस्य या पाठांतरवाल्यांना, पढिक पंडितांना समजणार नाही. ते केवळ भारवाहक आहेत. ''वेदांचे गव्हर नकळे पाठका'' वेदाचे हे रहस्य माझ्या सख्याने-विठ्ठलाने मला सांगितले आहे.

शास्त्राचें जे सार । वेदांची जो मूर्ती ।
तो माझा सांगती । प्राण सखा ।।

एका अभंगात तर ते म्हणतात :

तुका तरि सहज बोले वाणी ।
त्याचे घरी वेदान्त वाहे पाणी ।

हे ब्राह्मण समाजाला मानवणारे नाही. यातूनच ब्राह्मणपंडितांशी तुकारामांचा संघर्ष सुरू झाला. ज्ञानदेवांनीही सौम्य शब्दांत का होईना वेदांच्या संकुचित वृत्तीवर टीका केली आहे.

वेदु संपन्न होये ठायी । परि कृपणु आन नाही
(वेदांसारखा कंजुष दुसरा कोणी नाही.)
जे कांनी लागला । तीहिं वर्णाच्याचि ।।

पण तुकारामाचे शब्द बाण अतिशय टोकदार आहेत. 'मूले कुठार' या वचनाला अनुसरून वेदांचे मांत्रिक माहात्म्य त्यांनी झुगारून दिले. ते म्हणतात "वेदांचे गुह्य ते आम्हांसीच ठावे". त्यांना शूद्र कुळात जन्मल्याचे दुःख नाही. वेदवचन अब्राह्मणांना वर्ज्य, हा त्यांचा-ब्राह्मणांचा अहंकार आहे. म्हणूनच ते वर उल्लेखिलेले धारदार उद्गार काढतात.

शूद्र वंशी जन्मलों । म्हणोनि दंभे मोकलिलों
बरा कुणबी केलों । नाही तरी दंभेचि असतों मेलों

त्यांनी वेद वाचण्याची शक्यताच नव्हती. तसेच त्यांना तशी आवश्यकताच नव्हती. वेदांचा निर्माता जो परमात्मा (विठ्ठल) त्याने स्वतःच आम्हांला वेदांचे मर्म समजावून सांगितलें आहे. बाकीच्यांनी केवळ अर्थशून्य शब्दांची घोकंपट्टी करावी.

वेदांची अक्षरे याज्ञिके घोकावी । आम्ही नायकावी ती ।।
वेद आम्हांवरी रुसोनिया गेला । आम्ही त्यांच्या बाला धरिलें कंठी ।
तुका म्हणे वेद स्वप्नाचे येईल । ते काय येईल जागृतीसीं ।।

(कांही प्रतीत 'त्यांच्या बाला धरलें कंठी' हा पाठ येत नाही.) तुकोबांचे आणखी बरेच उद्गार उच्चवर्णियांना मानवणारे नाहीत.

तुका तरी सहज बोले वाणी ।
त्याचे घरी वेदांत वाहे पाणी ।।

यासारख्या कठोर फटकळ उद्गारांनी ब्राह्मण समाज संतप्त झाला. यामुळेच त्यांच्या अभंग वह्या पाण्यात टाकण्याचा प्रयत्न झाला असावा. तुकाराम वेदांचा आदराने उल्लेख करतात. पण तो करताना वेदांचा आशय पूर्ण बदलून टाकतात. यात्वात्मक वेदवाङ्मयाहून भक्तिवाङ्मयाचा आशय पूर्ण वेगळा आहे.

वर्ण-जातिव्यवस्थेचा प्रारंभच पुरुषसूक्तात (ऋग्वेद) झालेला असल्याने याचाही येथे थोडक्यात विचार करू. चार्वाक, गौतमबुद्ध, सरहपाद (५वे शतक), बसवेश्वर, ज्ञानदेवादी संत, चोखामेळा या सर्वांनी या अन्याय्य व्यवस्थेचा निषेध केला. पण कोणीही या व्यवस्थेला फारसा मोठ्ठा धक्का दिलेला नाही. या अन्यायाला प्रतिकार करण्याचा प्रयत्न करताच बसवेश्वर (११वे शतक) यांना जलसमाधी घ्यावी लागली. मराठी संतांनी या व्यवस्थेला वळसा देऊन आध्यात्मिक पातळीवर ही व्यवस्था अमान्य केली. एकनाथांनी या अन्याय्य व्यवस्थेला कल्पनेच्या पातळीवरील एक घटना चित्रित केली. (संत एकनाथ पाहा.) तुकारामांनी भक्तीच्या पातळीवरच अधिक प्रभावी पाऊल टाकले.

जो हे दूषी हरीची कथा । त्यासी क्षयरोग व्यथा ।
याती वर्ण श्रेष्ठ । परी तो चाडांळ पापिष्ट ।।

तुकाराम पुढील एका अभंगात वैष्णवांचे वैशिष्ट्य सांगतात.

**तुकारामांचे जीवितकार्य** (समाजाचे प्रबोधन-जगाला नीती देणे)

धर्म रक्षावयांसाठी । करणे आटी आम्हांसी
वाचा बोलो वेदनीती । करूं संती केलें तें ।।
धर्माचे पाळण । करणें पाषांड खंडण ।।
आम्हां हे कौतुक जगा द्यावी नीत । करावें फजित चुकती तें ।।
तीक्ष्ण उत्तरे । हाती घेउनि बाण फिरे ।।
नाही भीड भार । तुका म्हणे साना थोर ।।

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासीं
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्तावया
सांडू संतांचें मारग । आड राने भरलें जग
........................
अर्थे लोपली पुराणें । नाश केला शब्द ज्ञाने
विषयलो भी मन । साधनें बुडविली
पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।।

तुकारांमाची साधक अवस्था संपताच मुक्ती आनंदात स्वस्थ न बसता ते समाजप्रबोधनासाठी उर्वरित जीवन वेचायचा त्यांनी निर्णय घेतला. आणि याच दृष्टीने त्यांच्या कठोर, निर्भय वृत्तीने चालविलेल्या 'शब्दबाणयुद्धा'कडे पाहिले पाहिजे.

समाजामध्ये मूल्यविषयक प्रचंड अज्ञान जेव्हां पसरते तेव्हा समाजाची प्रगती कुंठित होते. धर्म-अर्धमाचा विचार रहात नाही. धर्माच्या नावाने अर्धमाचीच सत्ता प्रस्थापित होते. अशा प्रसंगी थोर विचारवंत, सत्पुरूष पुढे येतात आणि समाजाला मार्गदर्शन करतात. ही वैश्विक प्रक्रिया 'संभवामि युगे युगे' अशा स्वरूपात भगवद्गीतेने शब्दबद्ध केली आहे. मध्ययुगापासून शिवकालापर्यंत हा प्रसंग दोन-तीन वेळा आला. ज्ञानदेव-नामदेव यांनी यात्वात्मक कर्मकांड युग (यज्ञयुग) संपवून भक्तियुगाला चालना दिली. दोन-अडीचशे वर्षांनंतर पुन्हा एकनाथांनी धर्मजीवनाला नवे रूप दिले आणि त्यानंतर पुन्हा दोन अडीच शतकांनतर रामदास-तुकारामांनी नव्याने अस्तित्वात येऊ लागलेल्या शिवयुगाला चालना दिली. समाज सुधारण्याच्या दृष्टीने-आमूलाग्र असे परिवर्तन घडवून आणायच्या दृष्टीने तुकारामांनी अंभगलेखनाच्या रूपाने चौफेर लोकशिक्षणाचे नवयुग सुरू केले. तुकाराम केवळ धार्मिक आध्यात्मिक पातळीवर लिहीत नाहीत. 'जगा द्यावी नीत' हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. मनुष्य स्खलनशील आहे. सुधारणेचा प्रभाव कमी होताच माणूस सुखलोलुपतेच्या भावनेने मृत झालेली कर्मकांडे यात्वात्मक विधी पुनश्च आचरणात आणू लागतो. (मृतश्रद्धा व कर्मकांडाचे

पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न हेमाद्री पंडिताने उत्साहाने सुरू केले होते.) निरनिराळी व्रतवैकल्ये, यज्ञयागादी कर्मकांडे यांचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न चालू होते. या प्रयत्नांचा गौरव करताना हेमाद्री म्हणतो, "क्षीणो कालवशात् पुनस्तरुणतां धर्मोऽपि संप्रापितः". तुकारामांच्या काळातही असेच धर्माचे थोतांड माजलेले दिसते. तुकारामांच्या अनेक अभंगात ते दिसून येते. यासाठीच तुकारामांना 'हाती घेऊनि बाण' दांभिक-ढोंगी साधू-बैरागी-गोसावी यांच्या विरुद्ध संघर्ष करावा लागला. वर्ण-जातिव्यवस्थेमुळे सामान्य माणसांवर या काळातही अन्याय होत होताच. (एकनाथांनी विठ्ठलालाच तसेच स्वर्गातील देवांना चोखोबांच्या घरीच एकादशीचे पारणे फेडायला बोलावून आणिले होते. (प्र.३ पाहा.) तुकारामांनी अनेक अभंगांत हीन जातीच्या विठ्ठलभक्तांना ब्राह्मणत्व दिले आहे. विठ्लाच्या दरबारात वर्ण-जातिभेदांना स्थान नाही. "नाही वर्ण धर्म याती । नामे अवघेचि सरती ।।" ज्यांना वेद ऐकूही दिला जात नाही त्यांना विठ्ठलाने वैकुंठपदही दिले. (तु.गा.१८३१) जात वर्णजन्मावर आधारलेली नाही.

ब्राह्मण तो याती अत्यंज असता । मानावा तत्त्वता निश्चयेसीं ।।
रामकृष्ण नामें उच्चारा सरळें । आठवी सावळे रूपमती ।
शांती क्षमा दया अलंकार अंगी ।।

वैष्णवांचे हे वैशिष्ट्य आहे की वर्ण-जाती हा भेद त्यांना मान्य नाही. 'भेदाभेद अमंगळ। वर्मे सर्वेश्वर पूजन ।' सर्व चारी वर्ण एकाच देहाचे आहेत. (उत्तरकाळात या वर्णव्यवस्थेला ईश्वरी मान्यता मिळाली.)

या क्षेत्रातील तुकारामांची शूद्र-पददलितांना मिळालेली देणगी खालील शब्दांत सांगता येईल– "ज्यांना उद्धाराचा स्वतःच्या उन्नतीचा मार्गच नव्हता, त्यांना तो मार्ग तुकारामांनीं आपल्या भक्तिविषयक विचाराने प्राप्त करून दिला. हा भक्तिमार्ग वेदादी साधनेपेक्षा गौण आहे अशी भावना होणार नाही याची तुकाराम काळजी घेतात. भक्ती वेदांच्या तुलनेत मुळीच कमी नाही. उलट भक्तीविना वेदादी अन्य साधना निरर्थक आहेत, असे तुकाराम आग्रहाने सांगतात. यापुढे जाऊन ते वेदांची निरर्थक घोकंपट्टी करणाऱ्या वरिष्ठ वर्णीयांचे महत्त्व संपवून टाकतात :

वेद अनंत बोलिला । अर्थ इतकाचि साधिला
विठोबासी शरण जावें । निजनिष्ठा नाम गावें

वेद स्वतःच भक्तीचे श्रेष्ठत्व सांगतात, 'चारी वेद जयासाठी । त्यांचे नाम धरा कंठी'. "आम्हांला संस्कृत भाषेतील वेद वाचता येत नाहीत म्हणून आम्हांला भक्तिमार्ग स्वीकारावा लागतो, अशी भूमिका नाही. चारी वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे ज्या विठ्ठलाचे माहात्म्य गातात तो विठ्ठलच आमचा सखा" असे स्पष्ट सांगून तुकाराम आपल्या प्रेमभक्तीचे माहात्म्य प्रस्थापित करतात. हीन जातीतील पददलितांना आत्मोन्नतीचा

र्ग उपलब्ध करून देणे हे तुकोबाचे एक महत्त्वाचे जीवनकार्य होते.

**जगा द्यावी नीत**

तुकारामांचे आणखी एक महत्त्वाचे जीवितकार्य म्हणजे समाजाला नैतिक मार्ग दाखविणे हे होय.

आम्हां हे कौतुक । जगा द्यावी नीत ।
करावे फजीत । चुकती ते ।।
धर्मरक्षायासाठी । करणे आटी आम्हांसि
वाचा बोलो वेदनीती । करू संती केले ते
न बाणता स्थिती अंगी । कर्म त्यागी लंड तो
तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ।।

तुकारांमाना समाजाचे अध:पतन पाहून वेदना होतात. ही परिस्थिती त्यांना पाहवत नाही :

बुडती हे जन । न देखवे डोळा
येतो कळवळा । म्हणोनिया
धर्माचे पाळण । करणे पाषांड खंडण
हेचि आम्हां करणे काम । बीज वाढवावे नाम
तीक्ष्ण उत्तरे । हाती घेउनी बाण फिरे
नाही भीडभार । तुका म्हणे साना थोर

कारास म्हणतात "आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी". तुकाराम धर्म आणि नीती यांवर भर देतात हे महत्त्वाचे आहे. धर्म म्हणजे केवळ अध्यात्म नव्हे. समाजजीवनाशी धर्म आणि नीती यांचा संबंध आहे. प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, धर्म आणि नीती यांची वाढ समाजात होते. राजा आणि प्रजा, स्वामी आणि सेवक, पिता व पुत्र, पती आणि पत्नी, गुरू आणि शिष्य इ. सामाजिक संबंधांतूनच नीतीचा उगम होतो आणि म्हणूनच तुकारामांनी ठिकठिकाणी धर्माबरोबर नीतीचाही मुद्दाम उल्लेख केला आहे. धर्मरक्षणाचे कार्य द्विविध आहे. तुसते सुष्टांचे परिपालन करून भागत नाही, तर दुष्टांचे खंडनही करावे लागते याची त्यांना पुरी जाणीव होती. म्हणूनच त्यांनी धर्मरक्षणाबरोबर 'पाखंड खंडणाची', नीतीपाठाबरोबर दंभस्फोटाचीही जबाबदारी पत्करली". ही जबाबदारी स्वीकारून तुकारामांनी आपले दुहेरी शस्त्र सज्ज केले. ढोंगी साधू, दांभिक प्रतिष्ठित पंडित, व्यभिचारी शाक्त तांत्रिक, भगव्या कफनीच्या, वस्त्रांच्या आधारे फसवे साधू-संन्याशी यांच्यावर तुकोबांनी आपले टोकदार बाण सोडण्यास सुरूवात केली. त्यातले एक दोन 'शब्दबाण' पाहू.

अल्पविद्या परी गर्व शिरोमणी । मजहूनी ज्ञानी कोण आहे।।
अंगी भरे ताठा कोणासी मानीना । साधूंची हेळणा स्वयें करी
सज्जनांच्या देही मानी जो विटाळ । त्रैलोकी चांडांळ तोचि एक ।
संतांची जो निंदा करी मुखी जप । खतेले* तें पाप व वज्रलेप ।।
(* साचलेले)

तुकारामांना गुरुसंपद्राय अमान्य आहे :

गुरुमार्गामुळे भ्रष्ट सर्वकाळ । म्हणती याती कुळ नाही ब्रह्मी ।
.... नसता करूनी होम खाती ,एकें ठायी । म्हणती पाप नाही मोक्ष येणें ।
इंद्रियांचे पेठे भला कौल देती । मर्यादा जकाती माफ केली ।
तुका म्हणे ऐसे गुरू शिष्य जाण । विठोबाची आण नरका जाती।।

चुकीच्या मार्गावरून जाणाऱ्यांना तुकाराम खरा मार्ग सांगतात. 'उजळावया आलो वाटा' असे सांगून ते उपदेश करतात. पण योग्य मार्गाने जाण्याचा उपदेश अनेकांना मानवत नाही. अशा प्रसंगी ते तीक्ष्ण बाण काढतात. 'जगा द्याया नीत' हा त्यांचा हेतू होता. 'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी ' असे ते समाजाला सांगतात. 'अनुभवाचे रस देऊ आर्तभूता' असे ते कळवळून सांगतात. पण त्यांना हे मार्गदर्शन नको असते. ''बुडतां हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणउनी ।।'' समाजाला ते म्हणतात, ''बोलिलों ते काही तुमचिया हिता'' पण सामान्य माणसांना उपदेश पटत नाही. आंधळ्या माणसाला दिसतच नाही; शेवटी हे आंधळे कूपातच पडणार, हे स्पष्ट दिसते. तुकाराम म्हणतात, ''नव्हों वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले'' पण सारा उपदेश व्यर्थ ठरतो, हे पाहून तुकाराम म्हणतात,

परपीडक तो आम्हां दावेदार । ...दडूं त्यागू बळे नावलोंकू
(न अवलोकू) डोंळा । राखू तो चांडाळ ऐसा दुरी ।

ढोंगी साधू भगवी वस्त्रे धारण करून समाजाला भुलवणारे संन्यासी, डोक्यावर केस वाढवून 'भूते आणिती अंगास' असे ढोंगी, मांत्रिक अशांचा तुकारामांनी चालविलेल्या समाजसुधारणेला विरोध होता असे दिसते. पारमार्थिक जीवनात जी क्रांती घडवून आणणारा सुलभ भक्तिमार्ग तुकारामांनी प्रस्थापित केला, योगयाग, मंत्रतंत्र, शाक्तविधी इ. कर्मकांडे यांवर त्यांनी जी कडक टीका सुरू केली, त्या टीकेने दुखावलेले वरिष्ठ वर्गातील धर्मपंडित तुकारामांच्या विरोधात उभे राहिले. रामेश्वर पंडितासारखे सर्वमान्य पंडितही तुकारामांच्या विरोधात उभे राहिले होते. एका शूद्राने वेदवाङ्मयावर आपल्याला आव्हान द्यावे, वेदांच्या 'बा'लाही त्याचा कंठ धरून आपल्या स्वत:च्या बाजूला उभे करावे हे त्या शास्त्रीपंडिताना कसे मान्य व्हावे? असा हा बिनतोड संघर्ष होता. यातूनच तुकारामांचे अभंग इंद्रायणी नदीत बुडविण्याची घटना झाली असावी असे

वाटते. पण उत्तरकालात हेच पंडित रामेश्वर भट्ट तुकारामांचे भक्त झाले. (चौदावे टाळकरी) पश्चातापाने, परिसस्पर्शाने ते संतच (सुवर्ण) झाले.

एका अभंगात तुकाराम समकालीन परिस्थिती किती भयावह झाली आहे हे सांगतात. पूर्वीच्या ऋषिमुनींनी धर्मरक्षणासाठी जो मार्ग सांगितला आहे त्याचे आचरण करून धर्माची पुर्नस्थापना करण्यासाठी आम्ही वैंकुठवासी येथे आलो आहोत. आज जग आडराने-अनीती अधर्माचरण यांनी भरले आहे–

आडराने भरलें जग
..अर्थे लोपली पुराणें
नाश केला शब्दज्ञानें
विषय लोभी मन साधने बुडविली

धर्माचे रहस्य जाणून न घेता केवळ शब्दज्ञानाची घोकंपट्टी करत बसणाऱ्या पंडितांचेच वर्चस्व झाले आहे. यामुळेच ऋषीमुनींनी सांगितलेल्या शुद्ध धर्माची स्थापना करण्यासाठी आम्ही वैकुंठातून भूलोकी आलो आहोत.

संताचे जीवित कार्य जाणून घेणारे अनेक उल्लेख तुकोबांच्या अभंगवाङ्मयात सापडतात. धर्मशुद्धी करून ऐहिक जीवन नीतिमय व्हावे यासाठी आम्हाला निरोप पाठविला, ''तुका म्हणे मज धाडिले निरोपा, मारग हा सोपा सुखरूप''. धर्मरक्षणाचे महत्त्वाचे हे कार्य संतसज्जनच करू शकतील, हे कार्य करू शकणारे संत अंतर्बाह्य शुद्ध असतात, तेच जगाला नीती देतील, हे सांगणारे अतिशय सुंदर काव्यात्म असे दोन-तीन अभंग पाहू :

चंदनाचे हात पाय ही चंदन ।
परिसा नाही हीन कोणी अंग ।।
दीपा नाही पाठींपोटी अंधकार ।
सर्वांगें साकर अवघी गोड ।।
तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।
पाहतां अवगुण मिळेचिना ।।
गंगाजळा पाही पाठीं पोट नाही ।
अवगुण तो काही अमृतासी ।।
रवि दीप काळिमा काय जाणे हिरा ।
आणिकां तिमिरां नाश तेणें ।।

अंधकार नाहीसा करण्याचे काम यांचेच. ज्ञानप्रकाश जेथे आहे तेथे अंधार कसा असू शकेल? अंधकार शोधण्यासाठी एक शहाणे गृहस्थ हातात दिवा घेऊन चालले. पण

त्यांना अंधार दिसेचना. संत-सत्पुरुष असेच सर्वांगाने शुद्ध असतात. ज्ञान-प्रकाशाने अज्ञान नाहीसे होते. येथे चंदन, परिस, साखर, गंगाजळ या उपमानांनी संतांच्या जीवनावर झगझगीत प्रकाश पडतो. विकृत झालेल्या समाजाला सुधारण्यासाठी सर्वांगाने शुद्ध, पवित्र असलेले संतच हे कार्य करू शकतात. तुकाराम तर म्हणतात की यासाठीच आम्ही वैकुंठाहून आलो आहोत.

**प्रपंच-परमार्थ**

कासया उदास असो देहावरी
अमृतसागरी बुडोनिया

तुकारामांचा भक्तिविचार नीट समजून न घेतल्याने अद्यापीही काही विचारवंत तुकारामांच्या लेखनाला केवळ भक्तिविचार सांगणारे संतवाङ्मय एवढेच त्याचे मूल्यांकन करतात. ज्ञानदेवांनी आणि एकनाथांनी भक्ती या संकल्पनेचे 'निष्काम कर्मयोगपर भक्ती' या शब्दांत मौलिक स्पष्टीकरण केले आहे :

तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागी ।। ( ज्ञा.१८.९१३)

ईश्वर हा सर्वात्मक असल्याने कर्तव्य कर्मे हीच फुले होतात. समाजधारणेसाठी कर्तव्य-कर्म महत्त्वाचे ठरते. कर्तव्यकर्म पुष्पांनी ईश्वराची पूजा होते. या पूजेनेच ईश्वराला अपार समाधान होते. श्रीकृष्णाने अर्जुनाला दुर्जनांचे निर्दालन करण्यासाठी युद्धसन्मुख केले. क्षत्रियांचे हेच कर्तव्य होय. तुकारामांनी तर अनेक प्रसंगी दुर्जनांचे, खलांचे निर्दालन करण्याला स्वकर्तव्य मानले आहे. क्षत्रियांनी हे कर्तव्य कर्म पार पाडावे. आम्ही विठ्ठलाचे भजन करत बसतो, तुम्ही हेच करा असे कोठेही म्हटलेले नाही. प्रपंचात कर्तव्यकर्माला विशेष महत्त्व आहे. अर्जुनाने तेच केले. शिवाजीराजांनी तेच केले. कर्तव्य पार पाडताना जी कृती करावी लागते त्याचे बरेवाईट परिणाम माझ्यावर सोपवा आणि तुम्ही निर्लेप वृत्तीने कर्तव्यकर्म पार पाडा. हाच निष्काम प्रपंच. तुकारामांनी अनेक अभंगात या निष्काम प्रपंचाचा गौरव केला आहे. यालाच निष्काम कर्मयोग असे गीतेत म्हटले आहे. विहित कर्माचरण प्रत्येकाने केलेच पाहिजे. ते कर्तव्य करताना स्वहितापलीकडे (निष्काम) जाऊन समाजाच्या हितासाठी एखादी कृती केली तर त्या कृतीचा दोष त्याच्या खात्यावर लिहिला जात नाही. तुकारामांनी अनेक अभंगात याचा उल्लेख केला आहे. ''अवघाची संसार केला ब्रह्मरूप । विठ्ठल स्वरूप म्हणोनिया ।।''.

समाजाच्या कल्याणासाठी देव अवतार घेतो तसेच तो भक्तांच्या संसारातही रस घेतो. दोघांचाही विचार एकपणेच झाला पाहिजे. या विषयावरील तुकारामांचा एक महत्त्वाचा अभंग पाहू :

मुक्तिपांग नाही विष्णूचिया दासा ।
संसार तो कैसा न देखती ।।
बैसला गोविंद जडोनिया चित्तीं ।
आदि तोचि अंती अवसान ।।
भोग नारायणा देऊनी निराळीं ।
ओविया मंगळी तोचि गाती ।।
बळबुद्धी त्यांची उपकारासाठी ।
अमृत ते पोटीं साठवलें ।।
दयावंत तरी देवाच सारखी ।
आपली पारखी नोळखती ।।
तुका म्हणे त्यांचा जीव तोचि देव ।
वैकुंठ तो ठाव वसती ते ।।

संत-सत्पुरुष हे अध्यात्म आणि प्रपंच या दोन्ही वृत्तीत रस घेतात. प्रपंचाचा त्याग तुकाराम सांगत नाहीत.

धन्य ते संसारी । दयावंत जे अंतरी ।
येथे उपकारासाठी । आले घर ज्या वैकुंठी ।।

हे वैकुंठवासी संत येथे येऊन लोककल्याणासाठी देह झिजवतात-''भूतांची दया हे भांडवल संता''-त्यांचे स्वत:चे सुख 'पराविया' सुखातच असते. त्यांच्या मुखातून अमृत सदैव स्त्रवत असते.

### तुकारामांचा मानवतावाद

तुकारांमाच्या साहित्याचा सर्वात महत्त्वाचा विचार म्हणजे मानवतावाद हा आहे. अनेक संदर्भातील अभंगांमध्ये मानवतावादी एखादा चरण असतोच. संत-सत्पुरूषांचा गौरव अशा अंभगांत केलेला असतो. संत हेच या विचाराचे पुरस्कर्ते 'जे का रंजले गांजले' हा अभंग आपण यापूर्वीच पाहिला आहे. प्रेम, दया, करुणा ही मानवतावादी मूल्ये तुकारामांच्या अभंगांची मूलतत्त्वे आहेत. ज्यांना कशाचाच आधार नाही त्यांची सेवा हीच साधुसंतांची ईश्वर पूजा; इतकेच नव्हे तर साधुसंत हे भगवंताची मूर्तीच होय असे तुकोबा सांगतात.

तुका म्हणे सांगू किती ।
तोचि भगवंताची मुर्ति ।।

प्रेम, दया ही श्रेष्ठ मानवी मूल्ये असली तरी तुकोबांची ही मूल्यश्रद्धा, अंधश्रद्धा नाही. एका अभंगात ते म्हणतात :

दया तिचे नाव भूतांचे पालन ।
आणिक निर्दळण कंटकांचे ॥

तुकारामांची याबाबतची श्रद्धा वास्तवाची जाणीव ठेवणारी आहे :

सर्वा भूतीं द्यावे अन्न । द्रव्य पात्र विचारोन ।
उपदिष्ठे कारण । तेथे बीज पेरीजे ।
पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप ॥

मूल्यांची उपासना हे संतांचे वैशिष्ट्य हे खरे, पण त्याचबरोबर ऐहिक जीवनातील [illegible] व्यक्तींचे निर्दालन हे तत्त्व तुकोबा अनेक प्रसंगी सांगतात. "धर्म रक्षावयासाठी देवास ही आढी जन्म घेणे ॥" आवश्यक आहे. समाजाला नीती शिकविणे, [illegible] रक्षण करणे हे संताचे कार्य हे खरे, पण येथेही वास्तवाचे भान सुटता कामा नये ; तुकोबांच्या मानवतावादाचे वैशिष्ट्य आहे हे विसरून चालणार नाही.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म
भेदाभेद भ्रम अमंगळ
कोणीही जिवाचा न घडो मत्सर
वर्म सर्वेश्वर पूजनाचे
तुका म्हणे एका देहाचे अवयव
सुख दुःख जीव भोग पावे

विश्वातील सर्व मानवमात्र-प्रणिमात्र त्या सर्वेश्वराचेच घटक आहेत. त्या सर्वेश्वराचे पूजन म्हणजेच सर्वांना समान वागणूक हेच वैश्विक तत्त्वाचे म्हणजेच सर्वेश्वराचे पूजन हे पूजन म्हणजे गंध, फुले, नैवेद्य हे नव्हे. सर्व प्राणिमात्रांवर–विशेषतः मानवमात्रावर समतेचे-प्रेमाचे आवरण घालणे हे महत्त्वाचे आहे. याच वैश्विक प्रेमभावनेच्या [illegible] कल्पनेतूनच मानवतावादाचा उदय झाला. सर्व मानवमात्र एकाच छायेखालचे [illegible] आहेत. एवढेच नव्हे तर एकाच देहाचे ते निरनिराळे अवयव आहेत. तुकारामांच्या एका सुंदर अभंगात मानवतेच्या प्रेमाने ओथबंलेल्या आणि चिरंतन सत्याला शब्दरूप देणाऱ्या भव्योदात्त भावनाविष्काराचे दर्शन होते.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणें जो आपुले
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तेसें सज्जानाचें चित्त ॥
ज्यासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयी ॥
दया करणें जें पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥

आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दाचींच शस्त्रे यत्न करू ।।
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन ।
शब्दें वाटूं धन जनलोका ।
तुका म्हणे शब्दचि हा देव ।
शब्देचि गौरव पूजा करूं ।।

करितो कवित्व म्हणाल हे कोणी ।
नव्हे माझी वाणी पदरीची ।।
माझिया युक्तीचा नव्हे हा प्रसाद ।
मज विश्वंभर बोलवितो ।।
काय मी पामर जाणे अर्थभेद ।
वदवी गोविंद तोचि वदे ।।

आपुलिया बळे नाही मी बोलत ।
सखा भगवंत वाचा त्याची ।।
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी ।
शिकविता धणी वेगळाची ।।

विठ्ठलाने तुकारामांना लौकिक जीवनातून मुक्त करीतोपर्यंत तुकाराम साधक अवस्थेतच होते. या अवस्थेतील आर्तता, कारुण्य, जीवाची तगमग हा त्यांचा भावाविष्कार अप्रतिम अशा अनेक प्रतिमांच्या माध्यमांतून व्यक्त होऊन जिवाची उलघाल करून सोडणारे सुंदर काव्य म्हणून मान्यता प्राप्त झाले. पण श्रेष्ठ कवींचे काव्य केवळ या पातळीवरच राहात नाही. त्यांचे विचार, त्यामागील त्यांची जीवननिष्ठा, त्यांचे चिंतन या घटकांना अमर काव्यरूप लाभलेले असते. तुकारामांचे सर्व काव्य या भव्योदात्त पातळीवर आलेले आहे. त्यांचे काव्य अंत:स्फूर्तीने–आंतरिक प्रेरणेने शब्दरूप घेत असते. येथे शब्द जुळणीची कृत्रिमता यत्किंचितही नाही. अंत:प्रेरणेने भावार्थ प्रगट होऊ लागतो आणि शब्द त्यामागून धावत येतात. सुप्त मनामध्ये भावरसायन तयार होत असते. त्याला उत्कटता आली की शब्द भावोर्मीमागून धावत येतात. 'अंतरीचे धावे स्वभावें बाहेरी' (Spontanesous overflow of powerful feelings) या चरणात तुकारामांनी हेच सांगितले आहे. दीर्घ तप:श्चर्येने तुकारामांच्या अंतरंगाची जडणघडण तयार होत होती. (Emotion recollected in tranquility)

तुकारांमानी उद्ध्वस्त मन:स्थितीत विठ्ठलाकडे धाव घेतली. साधनाकालात अनेक सुंदर, उत्कट, भावपूर्ण अभंग लिहिले आणि अशा मन:स्थितीत तुकारामांना

साक्षात्कार झाला. या अवस्थेत त्यांनी लिहिलेले अभंग अलौकिक आहेत. या अभंगांपैकी काहींचा विचार आपण यापूर्वी केला आहेच. त्यांच्या जीवनातील अंधार निमाला आणि ते समाजाच्या कल्याणाचा विचार करू लागले. पूर्वायुष्यातील कृष्णछाया आता नाहीशी झाली होती. आता ते व्यक्तिगत जीवनापलीकडे गेले होते. सामाजिक जीवनाचे शुद्धीकरण करण्याच्या दृष्टीने ते लिहू-बोलू लागले. अपमार्गाने धर्माची विकृत साधना करणारे विविध पंथ-संप्रदाय यांच्यावर ते आता कठोर बाणवर्षाव (शब्दबाण) करून समाजप्रबोधनाचे–धर्मजीवन शुद्ध नैतिक पातळीवर आणण्याचे ध्येय डोळ्यापुढें ठेवून लेखन करू लागले. समाजप्रबोधनाचे कार्य करीत असतानाच त्यांनी आपली जीवनयात्रा शांत मनाने संपवली. शूद्रकुलात जन्मलेल्या तुकारामांनी वेदवाङ्मयावर अधिकारवाणीने लिहावे-बोलावे हे वीरष्ठ वर्णीय ब्राह्मणपंडितांना मान्य होणे शक्य नव्हते. उत्तरकालात तुकारामांचे अनुयायी झालेल्या रामेश्वर भट्टासारख्या पंडितांशी तुकोबांना संघर्ष करावा लागला. पण शेवटी सर्व संघर्षावर मात करून तुकारामांनी दिगंत कीर्ती मिळवली. या काळातील अभंगरचनाही मराठी काव्यातील सौंदर्य आणि आशयघनता या दोन्ही अंगांनी समृद्ध काव्यरचना म्हणून मान्यता प्राप्त झाली. हा सर्व विचार करून शेवटी समृद्ध तुकाराम पर्वातील अखेरच्या आनंदयात्रेचे अंतरंग पाहू. तुकारामांच्या साधक अवस्थेत त्यांनी लिहिलेले अभंग म्हणजे त्या त्या क्षणातील उत्कट भावनुभवाला शब्दरूप देणारी भावकाव्येच आहेत, हा विचार यापूर्वी आपण केला आहेच. पण या समारोप प्रकरणात त्यांचा अल्पसा पुन्हा उल्लेख करणे आवश्यक आहे.

तुकाराम आपली आत्मानुभूती व्यक्त करणयासाठी एकाद्या सुंदर प्रभावी उपमानाची योजना करतात त्यांचा भाव ते उपमानच व्यक्त करून जाते. हे उपमान इतके अर्थपूर्ण असते की ती प्रतिमा उलगडून दाखवावी लागतच नाही. कवीचा भाव अंतकरणाला जाऊन भिडतो. तुकाराम विठ्ठलाला कळवळून विनंती करतात की मला 'जाणोनि नेणते कर, व्यवहारात सर्व कर्मांचे आचरण करीत असलो (कर्मयोग) तरी प्रपंचात मी गुंतून पडणार नाही' हा निष्काम कर्मयोग समजावून देणे कठीण आहे. पण कवी (तुकाराम) येथे 'जेवी जळा आंत पद्मपत्र' (पाण्यात राहून कोरडे असणे) ही प्रतिमा योजतात. या प्रतिमेतून सर्व आशय स्पष्ट होऊन जातो. याच संदर्भात आलेली आणखी एक सुंदर प्रतिमा म्हणजे 'दुडी वर दुडी चाले मोकळी गुजरी'. या प्रतिमेतून स्पष्ट होते की ती गुर्जरी डोक्यावरील दोन घटांत (दुडीवर दुडी) गुंतून पडलेली नाही, तरी पण ते पाण्याचे घट सांभाळतेच. गुंतून न पडता संसारही काळजीपूर्वक सांभाळावा लागतोच. तुकाराम अशा अनेक सुंदर परिणाम साधणाऱ्या तसेच अर्थपूर्ण प्रतिमा निर्माण करीत असतातच.

एका अप्रतिम अभंगात प्रेमाचा आनंद तुकारामांनी व्यक्त केला आहे. हा

आनंद प्रेम देणाऱ्याला जाणवत नाही, पण तो आनंद प्रेम घेणाऱ्याला आनंदविश्वात नेतो हे सांगणाऱ्या एकापेक्षा एक सरस, मनाला आंनदविश्वात नेणाऱ्या प्रतिमांच्या रूपाने ते आपला भाव व्यक्त करतात :

कमोदिनी काय जाणे तो परिमळ ।
भ्रमर सकळ भोगितसे ।
तैसे तुज ठावें नाहीं तुझे नाम ।
आम्हीच ते प्रेमसुख जाणों ।।
माते तृण बाळ । दुधाची ते गोडी ।
ज्याची न ये जोडी त्यांसी कामा।।
तुका म्हणें मुक्ताफळ शिंपी पोटीं ।
नाही त्याची भेटी भोग तिये ।।

देवावरील भक्ताचा प्रेमाचा आनंद भक्तालाच होत असतो. मातेच्या दुधाचा आनंद बालकालाच होतो. प्रेमाचा आस्वाद घेणाऱ्या व देणाऱ्या व्यक्तींच्या प्रतिमांचा हा अभंग अतिशय भावपूर्ण आणि मार्मिक आहे. समीक्षकांना अलंकारशास्त्राचे बरेच वावडे आहे. भारतीय अलंकारशास्त्रात मुळात कृत्रिमता नाही. अभेदप्रतितीतून एकता साधणे (उपमान-उपमेय यांची अभेद प्रतीती) हे कवीचे उद्दिष्ट असते. उपमेय आणि उपमान हे द्वंद्व राहता उपयोगी नाही. जास्तीत जास्त एकता जाणवली पाहिजे. प्रतिमा हा शब्द आपल्याकडे अगदी अलीकडे आला आहे. डी. जी. जेम्सने प्रतिमेची कल्पना स्पष्ट केली आहे. तो म्हणतो :

"The test of good metaphor is the degree to which the poet can at once suggest and destroy equivalence, so that the two objects (उपमान-उपमेय) unite and coalesce".

ज्ञानेश्वर आणि तुकारामांनी अशा असंख्य अर्थपूर्ण आशयसंपन्न प्रतिमा आपल्या काव्यात निर्माण केल्या आहेत. विठ्ठलाची भेट त्वरित होत नाही यामुळे तुकोबांची मन:स्थिती कशी अस्वस्थ आणि हळवी झाली होती याचे अत्यंत मार्मिक चित्रण केले आहे. येथे अंत:प्रेरणेतूनच ते अर्थपूर्ण उपमान निर्माण करतात :

चुकलिया माये । बाळ हुरू हुरू पाहे ।
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळे ।

विठ्ठलाने पांघरलेला पाषाणाचा बुरखा या प्रतिमा तुकोबांच्या अंत:करणातील तगमग आणि त्यांना आलेले नैराश्य, वैफल्य या भावनांद्वारा वाचकाला उत्कट, तीव्र अनुभूती आणून देण्यास समर्थ आहेत याचा विचार पूर्वी केला आहेच. या प्रतिमा वाचकाच्या अंत:करणाला जाऊन भिडतात. प्रतिमासौंदर्य हा काव्याच्या सौंदर्याचा

महत्त्वाचा घटक असला तरी श्रेष्ठ कवींच्या काव्याचे मूल्यांकन करण्यासाठी मूलभूत तत्त्वचिंतनाचे महत्त्व अधिक आहे. या दृष्टीने पाहू जाता ध्यानात येते की तुकाराम साहित्य हे महाराष्ट्राला (अन्य राज्यांनाही) फार मोठी देणगीच आहे. जीवनातील लौकिक अंगापासून अध्यात्मापर्यंत तुकारामाचे सर्व अभंगवाङ्मय अत्यंत महत्त्वाचे आहे. ऐहिक मूल्यांच्या पातळीवरून ते आत्मज्ञानापर्यंत झेप घेतात. नैतिक, धार्मिक, सामाजिक वर्ण-जातिव्यवस्थेसह जीवनातील बहुतेक सर्व अंगांवर त्यांनी वैचारिक प्रकाश टाकला आहे. या सर्व क्षेत्रांतील रूढ श्रद्धांना धक्का देऊन त्यांनी नवयुगनिर्मितीचा ध्वज फडकावला.

मानवी जीवनातील गूढ मर्मस्थाने शोधणारा ज्ञानदेवांनंतर तुकारामांच्या पातळीवर येणारा दुसरा कवी झाला नाही. तुकारामांच्या काव्याचे अंतरंग शोधताना तुकारामांचे एक भाष्यकार दि. पु. चित्रे यांनी कवितेची जी कल्पना स्पष्ट केली आहे ती महत्त्वाची आहे. 'कविता म्हणजे जाणीवेची अविरत वाढणारी शब्दरूप घटना'. तुकारामांच्या काव्याचे अंतरंग उलगडण्याचा प्रयत्न करताना चित्रे म्हणतात, 'आत्मनिरूपणाचे स्वरूप असलेली आणि विश्ववास्तवाचाही त्याच वेळी ठाव घेणारी, आत्मनिष्ठ कविता लिहिणारा पहिला कवी' तुकाराम होत. 'अमृतानुभवा'तील 'अद्वैतातील द्वैत' स्पष्ट करताना तुकाराम सहज बोलून जातात–

आनंदाचे डोंही आनंद तरंग ।
आनंदचि अंग आनंदाचें ॥

अद्वैतातील द्वैताची कल्पना तुकारामांच्या प्रेमभक्तीतून आली आहे. तुकाराम जेव्हा "अद्वैताची वाणी । नाही ऐकत मी कानीं" असे म्हणतात तेव्हा ते प्रेमभक्तीचा विचार मनापुढे ठेवतात. देव आणि भक्त हे द्वैत प्रेमानंदाचा आस्वाद घेण्यासाठीच आहे. वैश्विक जाणीव आल्याशिवाय या प्रेमभक्तीचा उलगडा करणे अशक्य आहे. शुद्ध अद्वैत कल्पना स्वीकारल्यास विश्व मिथ्याच मानावे लागते. हा सर्व विचार ज्ञानदेवांनी 'अमृतानुभवा'त अत्यंत सुंदर शैलीत मांडला आहे. तुकाराम जेव्हा आपल्या "हेचि दान देगा देवा" या अभंगात "तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हासी" हा विचार मांडतात तेव्हा त्यांच्यापुढे विश्वचक्राची जाणीव होती. अंतिम तत्त्वात वैश्विक एकात्मता असली तरी प्रेमभक्तीसाठी द्वैत मानावेच लागते, हा विचार समजल्याशिवाय तुकारामांचे काही सुंदर अभंग समजणारच नाहीत. त्यांतील सौंदर्य जाणवणारच नाही. सर्व विश्व त्यानेच व्यापले आहे. अनंतविश्वी तोच आहे. पण तो आपणाला दिसत नाही, जाणवत नाही. खरे म्हणजे हे अनंत विश्व त्याचेच प्रतिबिंब आहे; त्याची क्रीडा आहे असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. यासाठी तुकाराम एका सुंदर काव्यात्म तसेच अगाध सत्तेची जाणीव करून देणाऱ्या अभंगात या अनंताची ओळख करून देतात :

जिकडे पाहावे तिकडे उभा ।
अवघ्या गगनाचा गाभा ।
डोळा बैसले बैसले।
रूप राहोनि संचले ।।
न वर्जिता दाही दिशा ।
जिकडे पाहे तिकडे सरिसा ।।
तुका म्हणे समपदी ।
उभा दिठिचिये आधी ।।

सर्व विश्व आकाशरूपाने दिसते, (एक कणभर) पण ते विश्वरूपाने जाणवत नाही तोच दृष्टी तिकडे जाण्यापूर्वीच समपदी उभा असलेला दिसतो-जाणवतो (अनंताचे प्रतीक). तुकारामांचे हे जे काव्य आहे तेच चिरंतन सौंदर्याचे प्रतीक आहे. तुकारामांची ही जी कविता आहे, ती वैश्विक सौंदर्याचे शब्दरूपाने दर्शन घडवणारी आहे. तुकारामांच्या समीक्षकांना काव्याच्या रचनेचा 'घाट' (फॉर्म) येथे कल्पनेत रुतवून ठेवण्याने या कवितेचे माहात्म्य जाणवणार नाही. येथे या काव्यातील भाव विचारांच्या माध्यमातून व्यक्त होतात. उत्कट अनुभूतीशिवाय भाव शब्दरूप घेतच नाहीत. मनाला भिडणारा अनुभव शब्दरूप घेतो हेच श्रेष्ठ काव्य. कविता वाचायला घेतली की जीवनविषयवाचक चिंतनात वाचक गढून जातो. प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे येथे पुस्तकी कसोट्या चालत नाहीत. जीवनातील अनेक घटना, त्यांचे चिंतन-मनन आणि त्यांतून होणारा वैश्विक सत्याचा शोध आणि शेवटी प्रखर तपस्येतून आलेल्या अनुभवाचा आविष्कार हेच या महाकवीचे अमर काव्य! बुद्धिवादी विचारवंतांनाही तुकाराम जाणवतात, भावतात ते यामुळेच! केवळ शब्दलालित्य व रचनासौंदर्य हे श्रेष्ठ काव्याचे निकष नव्हेत. वैश्विक सत्य प्रगट करणारे अर्थपूर्ण शब्दबंध हेच श्रेष्ठ काव्याचे खरे द्योतक. म्हणजे काव्याचे शरीररचनासौंदर्य आणि काव्याचा आशय म्हणजे रसरूपी आत्मा अशी विभागणी करणे हे चुकीचे आहे. आत्मा आणि शरीर या भिन्न आणि स्वतंत्र वस्तूंमध्ये मनुष्याचे मनुष्यत्व नसून आत्म्याच्या सगुण-साकार आविष्कारात ते असते तसेच काव्याचे आहे. काव्याचे काव्यत्व स्वतंत्रपणे आशयात म्हणजेच भाववृत्तीत अगर केवळ भावनुभूतीच्या आविष्कारात नसून ते भावानुभवाच्या आविष्कारात असते. Form is the flesh itself of the idea. भावानुभूती उत्कट असल्यास आविष्कार सहज काव्यरूप घेतो. तुकारामांना आपला अनुभव व्यक्त करण्यासाठी रचनेसाठी शब्द शोधत बसावे लागत नाही 'भावानु भवामागे वाणी धावत येते'.

प्रापंचिक जीवन उद्ध्वस्त झाल्यानंतर तुकारामांना अतिशय खडतर तपश्चर्या करावी लागली; अनंत यातना भोगाव्या लागल्या. या साधनाकालात विठ्ठलाला त्यांनी टाहो फोडून आवाहन केले. विठ्ठल त्यांची परीक्षाच पाहात होता. पाषाणाचा बुरखा

पांघरूनच तो शांत बसला होता. तुकोबांनी त्या पाषाण बुरख्यावर डोके आपटून देहत्याग करण्याचा निर्णय घेतला. अहंकारादी विकारांशी संघर्ष करूनच तुकारामांनी हे युद्ध जिंकले–"रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग". यातून बाहेर पडल्यावर तुकारामांना सर्वत्र मान्यता प्राप्त झाली. रामेश्वर भट्टासारखा तुकारामांचा एकेवेळचा विरोधक त्यांचा अनुयायी झाला. तुकारामांच्याच शब्दांत सांगायचे तर "जया अंगी मोठेपण तया यातना कठिण" सर्व दुःख-यातनांतून मुक्त होऊन तुकारामांची आनंदयात्रा सुरू झाली. अगदी अशाच मोजक्या शब्दांत वैश्विक सत्य सांगण्याचे बौद्धिक सामर्थ्य अशा युगपुरुषाच्या वाणीतूनच प्रगट होते. अडीच हजार वर्षांपूर्वी हेच वैश्विक सत्य (जया अंगी मोठेपण....) सॉफक्लिस हा ग्रीक कवी जसेच्या तसे सांगतो. (ग्रेट मेन थिंक अलाइक) "This Law is immutable for mortals greatly to live is greatly to suffer".

तुकारामांनी आपल्या भावकाव्यात (अभंग) अशी सुभाषितवजा अनेक सुंदर आणि आशयसंपन्न काव्ये शब्दबद्ध केली आहेत. आपण आता या प्रकरणात तुकारामांच्या निर्वाणाचा विचार करीत आहोत. संपूर्ण जीवन यातनामय झाल्यानंतर आता ते अपूर्व अशा आनंदयात्रेचे भावकाव्य लिहीत आहेत. मला तुकारामांच्या या आनंदावस्थेचे वर्णन करणारे मोजकेच अभंग निवडावे लागले. ही अवस्था आध्यात्मिक असो अथवा भव्योदात्त अशा ऐहिक पातळीवरील असो, दारुण यातनाभोगानंतर या थोर पुरुषांना सात्त्विक आनंदावस्थाच प्राप्त होते. अनंत दुःखांच्या यातनांच्या परिस्थितीतून बाहेर पडल्यानंतर जीवनकार्य पूर्ण होवो वा न होवो या युगपुरुषांना आनंदच प्राप्त होतो. (कर्तव्यपूर्तीचा आनंद) धर्मराजाचे देवांनी स्वर्गात स्वागत केले. भीषण यातना भोगानंतर (ग्रीक नायक) ईडिपसवर पुष्पवृष्टी करून देवांनी त्याचे स्वागत केले. तुकाराम तर मृत्यूचे स्वागत करून आनंदमय जीवनावरच अप्रतीम असे अभंग लिहून वैकुंठारोहण करण्याची योजना करतात, आणि या निर्वाणाचा काव्यात्म भाषेत अनुभव घेतात. हा केवळ काव्यात्म संकेत नसून हे एक वैश्विक सत्य आहे. अरिस्टॉटलने या आनंदसिद्धांताचे 'कॅथार्सिस' या शब्दात वर्णन केले आहे.

तुकारामांनी आपली निर्वाणाची घटना सार्वत्रिक आनंदाची घटना बनविली आहे. ही घटना नव्हे, हा एक आनंदसोहळा आहे आणि तो अनुपम्यही आहे.

आपुले मरण पाहिले म्यां डोळा ।<br>
तो जाला सोहळा अनुपम्य ।<br>
आनंदे दाटली तीन्ही त्रिभुवने ।

असे तुकाराम सांगतात. स्वतःच्या निर्वाणामुळे माझा पुर्नजन्मच झाला. एके काळी माझ्या 'मी'च्या पुर्नजन्मापूर्वी मी अहंकाराने एकदेशी झालो होतो. आता माझा अहंकार

गळून पडल्यामुळे 'मी' पूर्वीचा 'मी' राहिलो नाही. आता मी विश्वरूप झाल्यामुळे माझा आनंद माझ्यापुरताच राहिला नाही. माझ्या 'मी'ची वृत्ती विश्वाव्यापक झाली. म्हणूनच विठ्ठलाने (विठ्ठल हे विश्वतत्त्वच) मला जवळ घेतले. मी आता संकुचित वृत्तीचा, पूर्वीचा 'मी' राहिलो नाही. संकुचित वृत्ती गळून पडल्याने पूर्वीचा 'मी' मरण पावला आणि मी (तुकाराम) 'विश्वत्मकच झालों' मीत्व म्हणजे 'माझे तुझे' गळून गेले; म्हणजेच 'आपुले मरण पाहिले म्यां डोळा'. आता पूर्वीचा 'मी' मरण पावल्याने नव्या विश्वात्मक 'मी'तून मानवतावादी नवा तुकाराम उदयाला आला. आता हा नवा तुकाराम म्हणतो–

ज्यांसी आपांगिता नाही । त्यासिं धरी जो हृदयी ॥
दयाकरणे जे पुत्रासी । तोचिं दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगंवताची मूर्ती ॥

हाच पुर्नजन्म झालेल्या तुकोबांचा मानवतावाद. अखेर-अखेरच्या अभंगांतील 'घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्यी हाती' हा अभंग विशेष महत्त्वाचा आहे. ब्रह्मज्ञान, मोक्षप्राप्ती झालेल्यांची आत्मस्थिती या सर्वांपलीकडे आता तुकोबा गेलेले आहेत. त्यांचा आत्मविश्वास आता शिगेला पोचला आहे. म्हणूनच ते आता भक्तिपलीकडील अन्य साधना बाजूला सारून भक्तीचे माहात्म्य सांगत आहेत. वेदान्त्यांचेही महत्त्व ते मानत नाहीत. प्रेमभक्तीमध्ये रमलेल्या संतांचा–तुकोबांचा आनंद पाहून ब्रह्मज्ञानीसुद्धा प्रेमभक्तीच्या रसाळपणामुळे मुग्ध झाले आहेत; रुक्ष, भावशून्य आत्मस्थिती (आत्मस्थिती=मोक्षावस्था) सोडून आत्मस्थितीचा-मोक्षाचा त्याग करून भक्तिप्रेमाच्या आनंदाचा आस्वाद घ्यावा असे त्यांनाही वाटू लागले आहे. तीर्थयात्रा, स्वर्गवास, तपोनिधींचा अभिमान, यज्ञकर्म या सर्वांना लाजवण्याचे सामर्थ्य माझ्या भक्तिरसात आहे, स्वर्गसुखही क्षणिक आहे, संपूर्ण धर्मजीवनाला नवे वळण लावण्याचे सामर्थ्य भक्तिमार्गात आहे, हे तुकोबा आपल्या विशिष्ट शैलीत लोकांना सांगतात आणि त्यांनाही आवाहन करतात. 'ब्रह्मज्ञान्यांना लाळ घोटायला लावीन' हे सांगण्याचा प्रयोग धाडसी आहे. हा सांस्कृतिक परिवर्तनाचा प्रयोग आणि तोही काव्याच्या माध्यमातून केला जात होता हे महत्त्वाचे होते. संपूर्ण भारतीय समाजाचे धर्मजीवन-सांस्कृतिक जीवन वाङ्मयात रुतलेले होते. (मंत्रवाङ्मय-वेदवाङ्मय) मंत्रवाङ्मय आणि संस्कृतवाङ्मय यांत फार मोठा भेद मला अभिप्रेत आहे. संस्कृत भाषेतील साहित्य मराठीत आणिले हे तर महत्त्वाचे आहेच, पण याहून अधिक महत्त्वाचे कार्य म्हणजे मंत्रवाङ्मयाचे (खरे म्हणजे यात्वात्मक वाङ्मयाचे) दैवी माहात्म्य झुगारून देऊन संतानी-विशेषत: ज्ञानदेव-तुकारामांनी सांस्कृतिक क्रांतीच घडवून आणिली. आपण आता ज्या अभंगांचा विचार करीत होतो; (घोटवीत लाळ...) त्यातील प्रामुख्याने जप, तप, यज्ञ, स्वर्गप्राप्ती यांसारख्या यात्वात्मक कर्मकांडाचे महत्त्वच तुकोबांनी नाहिसे करून टाकले. 'लाळ घोटविणे'-लाजविणे या शब्दप्रयोगाने

या कर्मकांडाची एक प्रकारची हेटाळणी त्यांनी केली आहे. भक्तीचे सुख-आनंद पाहून ब्रह्मज्ञानी पुरुषांच्या तोंडाला पाणी सुटेल. (घोटवीन लाळ). तुकाराम येथेच थांबत नाहीत. भक्तिसाधनेने, मानवतावादाने दया, प्रेम, करुणा, सहानुभूती यांसारख्या मानवतावादी मूल्यांच्या आधारे-म्हणजेच प्रेमभक्तीने जीवन सफल, संपन्न करावे हे विचार ते सांगतात. एवढेच नव्हे तर याच प्रेमभक्तीने आपण आपला उद्धार करून घेतला असे ते म्हणतात. याच भक्तिभाग्यप्रेमाने पुरुषार्थ साध्य करून घेईन असा त्यांचा आत्मविश्वास आहे. तुकोबा म्हणतात माझा हा दीर्घ प्रखर संघर्ष पाहून लोकही अभिमानाने म्हणतील की "सर्व संकटावर मात करून या ज्या महापुरुषाने वैकुंठ लोक प्राप्त करून घेतला तो तुकाराम आम्ही पाहिला, आम्ही धन्य आहोत, धन्य धन्य झालो आम्ही भाग्यवान आहोत". असे हे लोक माझें वैकुंठगमन पाहून म्हणतील-

धन्य म्हणवीन येंह लोकीं लोंका
भाग्य आम्हीं तुका दे देखियला

तुकारामांची लौकिक जीवनयात्रा येथे संपली. जनतेचा त्यांनी निरोप घेतला,

आम्ही जातो आपुल्या गावां । आमुचा राम राम घ्यावा ।
तुमची आमची हेचि भेटी ।। येथुनिया जन्मतुटी ।।

लोकांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांनी सर्वांचा निरोप घेतला. तुकारामांचे व्यक्तित्व येथे "तुका झाला आकशाएवढा" याच शब्दांत सांगावे लागते.

**तुकारामांची आनंदयात्रा**

लवण मेळवितां जळे । काय उरले निराळें ।
तैसा समरस जालों । तुजमाजी हरपलों ।।
अग्निकपुर्राच्या मेळीं । काय उरली काजळी ।
तुका म्हणे होती । तुझी माझी एक ज्योती ।।
तुका म्हणे मी तो सगळाच विरालों ।
विठ्ठलचि जालो दर्शनाने ।।
देशकाल वस्तुभेद मावळला ।
आता निर्वाळला विश्वाकार ।।

वरील अभंगातील तुकारामांचा अनुभव हा त्यांच्या दीर्घ तपश्चर्येचे फलित आहे. हा अनुभव केवळ अद्वैताचा नव्हे; विश्वाशी एकरूप झाल्याचा हा आनंद आहेच, पण यापुढे जाऊन तुकाराम म्हणतात- "....मी तो सगळाच विरालों । विठ्ठलचि जालो दर्शनाने ।" सामान्य मानवाला मिळालेला हा सर्वश्रेष्ठ सन्मान आहे. यापलीकडे मिळण्याजोगे काहीच राहिलेले नाही. तुकाराम सर्वेश्वराशी एकरूप झाले आहेत. सर्व भेदभाव निमाले. जलामध्ये लवण (मीठ) मिसळल्यावर ते लवण जलासी एकरूप होऊन जाते, तसेच तुकोबांचे झाले आहे. तुकारामांच्या काव्यप्रतिमा हे त्यांच्या

अलौकिक काव्यनिर्मितीचे साधन आहे. तुकोबांनी सर्वव्यापी विठ्ठलाशी-सर्वेश्वराशी एकरूप होणे म्हणजे विश्वव्यापी जलतत्त्वाशी एकरूप होण्यासारखेच आहे. तुकाराम आध्यात्मिक आणि ऐहिक अशा दोन्ही पातळ्यांवर आपला आनंद व्यक्त करतात. मृत्यूनंतर पुन्हा पुन्हा मातेच्या गर्भात काही काळ काढून प्रेमभक्तीसाठी पुन्हा जन्म मिळावा म्हणून ''तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावें आम्हांसी'' अशी देवाजवळ मागणी करतात.

आनंदाचे डोहीं आनंद तरंग ।
आनंदचि अंग आनंदाचे ।।
गर्भाची आवडी मातेचा डोहेळा ।
तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे ।।

या अभंगाचा अधिक विचार केला पाहिजे. डोह आणि डोहावरील लाटा हे कल्पिलेले द्वैत आहे. आनंदासाठी हे द्वैत कल्पावे लागते. अंतिम अवस्थेला पोचलेला भक्त आणि देव हे एकच आहेत. पण तुकाराम हे पूर्णार्थाने मानत नाहीत. ''अद्वैताची वाणी। नाही ऐकत मी कानी ।'' असे ते एकदा ते म्हणतात. केवलाद्वैतामध्ये आनंद नाही, यासाठी द्वैताची कल्पना करावी लागली. 'नलगे मुक्ती ...' ( मला मोक्ष नको) भक्तीचा आनंद मोक्षात नाही. यासाठीच ते पुन्हा पुन्हा मातेच्या गर्भी जन्म मागून घेतात. हे कल्पिलेले द्वैत मिथ्याही नाही. चित्‌शक्तीचा द्वैत हा विलास आहे. हा विलास मिथ्या नाही. सागरावरील अगर डोहावरील लाटा मिथ्या नाहीत. अंतिमत: डोह आणि त्यावरील लाटा ही जलाची-वाऱ्याची क्रीडा आहे. देव आणि दृश्यविश्व हे द्वैत म्हणजे चित्‌शक्तीची क्रीडा आहे आणि यातच आनंद आहे. शुद्ध अद्वैताची वाणी मी ऐकतच नाही. द्विरूक्तीचा दोष पत्करून हे पुन्हा पुन्हा सांगावे लागते की चिद्विलासवाद आणि पूर्ण अद्वैत यांमध्ये भेद आहे. अद्वैताचे एकाकीकरण त्या आत्मतत्त्वालाही मान्य नाही; म्हणूनच ते तत्त्व एकटेपणाला कटांळून म्हणाले, 'एकोऽहं बहुस्याम् प्रजायेयम्'. अद्वैत वेदान्त न समजल्यामुळे गाडगीळ घोटाळा करीत आहेत असे आमचे ज्येष्ठ स्नेही म्हणाले तर त्यावर माझे उत्तर एवढेच आहे की तुकारामांचा अभ्यासक या नात्याने मी म्हणू शकतो की तुकारामांप्रमाणेच ''अद्वैताची वाणी । नाही ऐकत मी कानीं ।।''. ज्ञानी भक्ताचा प्रपंच कैवल्याहून श्रेष्ठ ही ज्ञानदेवांची भूमिका आहे. ज्ञानदेवच म्हणतात–

कैवल्याही चढावा । करीत विषयसेवा ।
झाला भृत्य-भुज्य-कालोवा । भक्तीच्या घरी ।। (अमृ. अ. ९)

हाच विचार तुकाराम सांगतात. विश्वाशी- विठ्ठलाशी एकरूप झालो असलो तरी ''भक्तीसाठी पुन्हा पुन्हा मातेच्या पोटी जन्म व्हावा'' असे तुकाराम पुन्हा सांगतात. ज्ञानदेवांचे वर दिलेले उद्‌गार तर अधिक स्पष्ट आहेत. अद्वैत आणि आनंदासाठी

कल्पिलेले द्वैत (क्रीडा) यांवर आधारलेल्या तुकारामांच्या अपूर्व-अलौकिक अशा अभंगातील रसामृताचा आस्वाद घेऊन या आनंदयात्रेचा समारोप करू :

आनंदाचे डोहीं आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे ॥१॥
काय सांगों जोंले काहींचियाबाही । पुढें चाली नाहीं आवडीनें ॥२॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ॥३॥
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सारिसा मुखा आला ॥४॥

जीवनाची अखेर या घटनेला तुकाराम आनंदोत्सव मानतात. वैकुंठगमन करण्यापूर्वी काही काळ तुकोबांनी हा अभंग लिहिला असावा. अद्वैत आणि द्वैत यांची चित्शक्तीने कल्पिलेली आनंदरूप क्रीडा हा या अभंगाचा विषय आहे. मानवी जीवनातील अत्युत्कट आनंदाचे क्षण येतात आणि काही काळाने लोप पावतात. पण तुकोबांची ही आनंदाची अनुभूती क्षणिक नाही, चिरंतन आणि सर्वांगांनी आस्वाद्य अशी आहे. आनदंचा डोह ही कल्पना अपूर्व आहे आणि या डोहावरील तरंगही आनंदाचेच. आनंदाचे अंग आनंदाचेच. तुकोबांच्या जीवनातील हा काळ सर्वांगांनी आनंदरूप होता. राग, लोभ, क्रोध, मोह, अहंकार हे सर्व विकार लोप पावल्यानंतर आनंदमय जीवनात आनंदशिवाय दुसरे काय असणार? हा अनुभव तुकाराम एका कोमल प्रतिमेने सांगतात. मातेच्या उदरात गर्भ राहिलेला आहे. मातेच्या दृष्टीने अत्युच्च आनंदाचा असा हा विषय आहे. तिला या परिस्थितीत होणारे डोहाळे हे सुद्धा आनंदाचेच तरंग आहेच. गर्भातील बालकाच्या आनंदामुळे तिला लागणारे डोहाळे सुद्धा आनंदतरंगच आहेत. तुकाराम येथे सुचवितात की आमच्या या अत्युच्च आनंदावस्थेत येणारे सुखदु:खाचे अनुभव आता आम्हाला आनंददायकच आहेत. हे अनुभव आमच्या आनंद डोहातील आनंदतरंगच आहेत. सर्व लौकिक सुखदु:खांच्या अतीत झालेल्या मनोवस्थेत आता तुकाराम आलेले आहेत. या अवस्थेतच तुकाराम–

आम्ही जातो आमुच्या गावां । आमुचा राम राम घ्यावा ।
...आता असो द्यावी दया । तुमच्या लागतसे पाया । ...

असा सर्वांचा निरोप घेऊन निजधामास (वैकुंठी) गेले. ही घटना ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीची आठवण करून देणारी आहे. रामेश्वर भट्ट म्हणतात :

तुकिता तुळनेसी । ब्रह्म तुकासी आले
म्हणोनि रामेश्वरी । चरणी मस्तक ठेविलें
भक्तिज्ञाने वैराग्य आगळा ।
ऐसा नाही डोळा देखियेला ॥
गुरू परब्रह्म देवांचा दो देव ।
त्यासी तो मानव म्हणू नये ॥

✤ ✤ ✤